**L. A. BILL No. LIX OF 2023.**

A BILL

TO PROVIDE FOR ESTABLISHMENT AND INCORPORATION OF A STATE BOARD TO REGULATE MATTERS PERTAINING TO DIPLOMA LEVEL ART EDUCATION IN THE STATE OF MAHARASHTRA, REGARDING AFFILIATION OF ART INSTITUTES AND COURSES OF STUDY THEREIN AND THE MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.

**सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५९.**

**महाराष्ट्र राज्यातील पदविका स्तरावरील कला शिक्षणाशी संबंधित असणा-या कला परिसंस्था व त्यातील अभ्यास पाठ्यक्रम यांचे संलग्नीकरण करण्याशी संबंधित असणा-या बाबींचे विनियमन करण्याकरिता राज्य मंडळाची स्थापना व विधिसंस्थापन करण्यासाठी आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक १९ डिसेंबर, २०२३ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र राज्यातील पदविका स्तरावरील कला शिक्षणाशी संबंधित असणा-या कला परिसंस्था व त्यातील अभ्यास पाठ्यक्रम यांचे संलग्नीकरण करण्याशी संबंधित असणा-या बाबींचे विनियमन करण्याकरिता राज्य मंडळाची स्थापना व विधिसंस्थापन करण्यासाठी आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या चौ-याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

एचबी—२५८६-१

## प्रकरण एक

## प्रारंभिक.

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ अधिनियम, २०२३, असे म्हणावे.

(२) तो, राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नियत करील अशा दिनांकास अंमलात येईल.

व्याख्या.

**२.** या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ आवश्यक नसेल तर,—

(क) "संलग्न परिसंस्था" याचा अर्थ, जिला मंडळाकडून संलग्नता देण्यात आलेली आहे, अशी परिसंस्था, असा आहे;

(ख) "नियत दिनांक" याचा अर्थ, हा अधिनियम ज्या दिनांकास अंमलात येईल तो दिनांक, असा आहे;

(ग) "कला" याचा अर्थ, ललित कला, दृक् कला किंवा केवळ संगीतापुरती मर्यादित असलेली प्रयोगनिष्ठ कला असा आहे ;

(घ) " पदविका स्तरीय कला शिक्षण " याचा अर्थ, मंडळाकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल त्याप्रमाणे पदविका किंवा पदवीकोत्तर पदविका किंवा पदव्युत्तर पदविका किंवा प्रगत पदविका स्तरावरील ललित कला किंवा दृक् कला किंवा केवळ संगीतापुरती मर्यादित असलेली प्रयोगनिष्ठ कला किंवा असे अन्य कला शिक्षण संपादन करण्यासाठी जे माध्यमिक शिक्षण, किंवा यथास्थिती, उच्च माध्यमिक शिक्षणानंतर घेता येईल असे कला शिक्षण, असा आहे ;

**स्पष्टीकरण.—** या खंडाच्या प्रयोजनार्थ, " कला शिक्षण " या शब्दप्रयोगामध्ये, नियामक प्राधिकरणाद्वारे वेळोवेळी घोषित करण्यात येईल त्याप्रमाणे, पदविका स्तरावरील उपयोजित कला, शिल्प कला, रेखा व रंगकला, कला व हस्तकला आणि शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रमाचा किंवा कोणत्याही पदविका स्तरावरील अध्ययनक्रमाचा समावेश असेल ;

(ङ) "कला परिसंस्था" याचा अर्थ, या अधिनियमाअन्वये मंडळाने मान्यता दिलेली कला शिक्षणातील पदविका किंवा पदवीकोत्तर पदविका किंवा पदव्युत्तर पदविका किंवा प्रगत पदविका देणारी परिसंस्था, असा आहे;

(च) "स्वायत्तता" याचा अर्थ, शैक्षणिक अध्ययनक्रम चालविण्यास, परीक्षा घेण्यास व संबंधित विषयासाठी अभ्यासक्रम तयार करण्यास आणि पदविका स्तरीय कला शिक्षणाशी संबंधित असणा-या परीक्षा उत्तीर्ण झाल्याची प्रमाणपत्रे देण्यास परवानगी असणा-या परिसंस्थेला प्रदान केलेला मंडळाचा विशेषाधिकार, असा आहे;

(छ) "स्वायत्त परिसंस्था" याचा अर्थ, जिला कलम ३३ अन्वये स्वायत्तता प्रदान करण्यात आलेली आहे अशी परिसंस्था, असा आहे;

(ज) "मंडळ" याचा अर्थ, कलम ५ अन्वये स्थापन केलेले महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, असा आहे;

(झ) "उपविधी" याचा अर्थ, कलम ५२ अन्वये मंडळाने केलेले उपविधी, असा आहे;

(ञ) "संचालक" याचा अर्थ, कलम २२ अन्वये नियुक्त केलेला महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळाचा संचालक, असा आहे;

(ट) "परीक्षा" याचा अर्थ, मंडळाने घेतलेल्या परीक्षा, असा आहे;

(ठ) "फी किंवा शुल्क " याचा अर्थ, शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क, संलग्नीकरण शुल्क किंवा मंडळाद्वारे वेळोवेळी विनिर्दिष्ट करण्यात येईल असे अन्य कोणतेही शुल्क, असा आहे;

(ड) "शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे;

(ढ) "नियामक परिषद" याचा अर्थ, मंडळाची नियामक परिषद, असा आहे;

(ण) "परिसंस्थेचा प्रमुख" किंवा "प्राचार्य" याचा अर्थ, मंडळाने मान्यता दिलेल्या पदविका स्तरीय कला शिक्षण देणा-या कला परिसंस्थेच्या अध्यापक वर्गाचा प्रमुख, असा आहे;

(त) "व्यवस्थापन" याचा अर्थ, ज्याच्या व्यवस्थापनाखाली एका किंवा अधिक परिसंस्थांचे संचालन करण्यात येते आणि त्यांना मंडळाचे विशेषाधिकार प्रदान करण्यात येतात असे, महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियमांन्वये नोंदणी केलेल्या कोणत्याही विश्वस्त संस्थेचे किंवा सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६० अन्वये नोंदणी केलेल्या कोणत्याही सोसायटीचे किंवा कंपनी अधिनियम, २०१३ याच्या कलम ८ अन्वये नोंदणी केलेल्या कंपनीचे विश्वस्त किंवा व्यवस्थापन किंवा नियामक मंडळ,–मग त्याला कोणत्याही नावाने संबोधण्यात येवो,—असा आहे;

१९५० चा २९.
१८६० चा २१.
२०१३ चा १८.

(थ) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमान्वये केलेल्या विनियमांद्वारे विहित केलेले, असा आहे;

(द) "प्रदेश" याचा अर्थ, अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे प्रत्येक प्रदेशात समाविष्ट असलेले क्षेत्र, असा आहे;

(ध) "प्रादेशिक कार्यालय" याचा अर्थ, संबंधित प्रदेशासाठी राज्य शासनाने स्थापन केलेले कार्यालय, असा आहे;

(न) "विनियम" याचा अर्थ, या अधिनियमान्वये मंडळाने केलेले विनियम, असा आहे;

(प) "विनियामक प्राधिकरण" याचा अर्थ, पदविका स्तरावरील कला शिक्षण परिसंस्था किंवा पाठ्यक्रम सुरू करण्यासाठी ज्याची मान्यता आवश्यक आहे असे आणि त्याच्याशी संबंधित असलेल्या बाबींचे विनियमन करण्यासाठी ज्याला प्राधिकृत केलेले आहे असे संसदेने केलेल्या कायद्याद्वारे किंवा त्याअन्वये स्थापन केलेले कोणतेही प्राधिकरण किंवा संस्था, असा आहे आणि त्यात, मंडळाचा समावेश होतो;

(फ) "अनुसूची" याचा अर्थ, या अधिनियमाला जोडलेली अनुसूची, असा आहे;

(ब) "अध्यापक" याचा अर्थ, मंडळाने मान्यता दिलेल्या परिसंस्थेचा प्राचार्य किंवा प्रमुख या व्यतिरिक्त अध्यापक कर्मचारीवर्गाचा सदस्य, असा आहे.

## प्रकरण दोन

## नियामक परिषदेची स्थापना, अधिकार व कर्तव्ये.

नियामक परिषदेची स्थापना.

**३.** (१) शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नियामक परिषदेची स्थापना करील, ती पदविका स्तरावरील कला शिक्षण व मंडळाने घ्यावयाच्या परीक्षा यांच्याशी संबंधित असणा-या बाबींचे नियंत्रण व संनियंत्रण करणारी शिखर संस्था असेल.

(२) नियामक परिषद, पुढील व्यक्तींची मिळून बनलेली असेल :—

| | | |
|---|---|---|
| (क) मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, | . . | अध्यक्ष ; |
| (ख) राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, | . . | उपाध्यक्ष ; |
| (ग) सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग किंवा त्याची नामनिर्देशित व्यक्ती, | . . | पदसिद्ध सदस्य ; |
| (घ) संचालक, कला संचालनालय, | . . | पदसिद्ध सदस्य ; |
| (ङ) संचालक, महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, | . . | सदस्य-सचिव ; |
| (च) उप संचालक (प्रशासन), कला संचालनालय, | . . | पदसिद्ध सदस्य ; |
| (छ) सचिव, महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, | . . | पदसिद्ध सदस्य ; |
| (ज) शासनाने नामनिर्देशित करावयाचे, कला क्षेत्रातील तीन ज्येष्ठ कला व्यवसायी, त्यापैकी किमान एक महिला असेल आणि अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती किंवा विमुक्त जाती किंवा भटक्या जमाती किंवा इतर मागासवर्ग किंवा विशेष मागास प्रवर्ग यांमधील एक व्यक्ती असेल, | . . | सदस्य. |

(३) पदसिद्ध सदस्यांव्यतिरिक्त, नियामक परिषदेचे सदस्य म्हणून वेळोवेळी नामनिर्देशित करण्यात आलेल्या व्यक्तींची नावे शासनाकडून **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात येतील.

(४) नियामक परिषदेच्या नामनिर्देशित केलेल्या सदस्यांचा पदावधी हा, राज्य शासनाकडून त्यांना त्यापूर्वीच पदावरून काढून टाकलेले नसेल तर, पाच वर्षांच्या कालावधीसाठी असेल.

(५) नियामक परिषद, प्रत्येक वर्षात तीनपेक्षा कमी नसतील, इतक्या बैठकी घेईल आणि लागोपाठच्या दोन बैठकींदरम्यान, चार महिन्यांपेक्षा अधिक कालावधी असणार नाही.

(६) नामनिर्देशित केलेल्या सदस्यांना, बैठकांना उपस्थित राहण्याकरिता शासन निर्धारित करील असे भत्ते मिळतील.

नियामक परिषदेचे अधिकार व कर्तव्ये.

**४.** या अधिनियमाच्या तरतुदींस अधीन राहून, नियामक परिषदेचे अधिकार व कर्तव्ये पुढीलप्रमाणे असतील :—

(क) मंडळाने सुपूर्द केलेल्या बाबी हाताळणे आणि मंडळाच्या शिफारशींना व निर्णयांना अंमलबजावणीच्या दृष्टीने मान्यता देणे ;

(ख) संबंधित उद्योग समुहांशी विचारविनिमय करून सम्यक विकास योजना तयार करणे ;

(ग) मंडळाच्या लेख्यांची, नियमितपणे आणि नियामक परिषदेला योग्य वाटेल अशा कालांतराने, चाचणी दाखल लेखापरीक्षा करण्याची शासनाला शिफारस करणे ;

(घ) परिसंस्थांचे अधिस्वीकृती धोरण ठरविणे ;

(ङ) मंडळाने सुपूर्द केलेल्या वित्तीय बाबींशी संबंधित असलेल्या अधिकारांचा वापर करणे ;

(च) मंडळाने शिफारस केलेल्या अर्थसंकल्पाला मान्यता देणे ;

(छ) शासनाने वेळोवेळी घेतलेल्या विविध धोरणात्मक निर्णयांच्या अंमलबजावणीच्या संबंधात मंडळाला निदेश देणे ;

(ज) मंडळाच्या नियंत्रणाखालील परिसंस्थांचे योग्य प्रचलन, कामकाज व निधी यांच्याशी संबंधित असलेल्या कोणत्याही बाबींच्या संबंधात चौकशी करण्याची शासनाला शिफारस करणे.

## प्रकरण तीन

## मंडळाची स्थापना, विधिसंस्थापन आणि अधिकार व कर्तव्ये.

मंडळाची स्थापना.

**५.** (१) शासन, या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ या नावाने संबोधण्यात येणारे एक मंडळ, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे स्थापन करील.

(२) मंडळ, पुढील व्यक्तींचे मिळून बनलेले असेल :—

(क) संचालक, कला संचालनालय, . . अध्यक्ष ;

(ख) विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय किंवा सहसंचालकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाची नसलेली त्याची नामनिर्देशित व्यक्ती, . . पदसिद्ध सदस्य ;

(ग) शासनाचा सहसचिव किंवा उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, किंवा त्याची नामनिर्देशित व्यक्ती, . . पदसिद्ध सदस्य ;

(घ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचा अध्यक्ष किंवा विभागीय मंडळाच्या अध्यक्षाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाची नसलेली त्याची नामनिर्देशित व्यक्ती, . . पदसिद्ध सदस्य ;

(ड़) संचालक, महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, . . सदस्य ;

(च) सचिव, महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, . . सदस्य-सचिव ;

(छ) राज्यातील शासकीय कला महाविद्यालयामधून शासनाने नामनिर्देशित करावयाचा, एक ज्येष्ठतम प्राचार्य, . . सदस्य ;

(ज) अनुदानित व विना-अनुदानित कला संस्थेमधील प्रत्येकी एक याप्रमाणे, कला परिसंस्थेचे प्राचार्य किंवा प्रमुख यांच्यामधून शासनाने नामनिर्देशित करावयाचे दोन सदस्य, त्यापैकी किमान एक सदस्य महिला असेल, . . सदस्य ;

(झ) दृक् कला किंवा केवळ संगीतापुरती मर्यादित असलेल्या प्रयोगनिष्ठ कला या व्यावसायिक क्षेत्रामधून, शासनाने नामनिर्देशित करावयाचे दोन सदस्य, . . सदस्य;

(ञ) माहिती तंत्रज्ञान, संग्रहालये व जाहिरात एजन्सी, नामांकित कला दालने, रत्ने व आभूषणे, वस्त्रनिर्माण व सिरॉमिक उद्योग या क्षेत्रांतील लघु उद्योगांतील उद्योजक असलेले, उद्योग संघातून शासनाने नामनिर्देशित करावयाचे चार सदस्य, . . सदस्य.

(३) ज्याच्या आधारे एखाद्या व्यक्तीची अशा प्रकारे नियुक्ती ते पद, पदनाम किंवा, यथास्थिति अधिकारपद धारण करण्याचे बंद झाल्याबरोबर ती व्यक्ती, मंडळाचा सदस्य म्हणून पद धारण करण्याचे बंद होईल आणि अशी व्यक्ती, तेव्हापासून एका आठवड्याच्या आत, ती मंडळाचा सदस्य असण्याचे बंद झाल्याचे अध्यक्षाला लेखी कळवील.

(४) पदसिद्ध सदस्यांव्यतिरिक्त, मंडळाचे सदस्य म्हणून, वेळोवेळी, नामनिर्देशित करण्यात आलेल्या अन्य व्यक्तींची नावे, शासनाकडून **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात येतील.

मंडळाचे विधिसंस्थापन.

**६.** कलम ५ अन्वये स्थापन केलेले मंडळ हे, अखंड परंपरा व सामाईक मोहोर असलेले निगम निकाय असेल, आणि त्याला करार करण्याचा, जंगम व स्थावर अशा दोन्ही मालमत्ता संपादन करण्याचा, धारण करण्याचा व त्यांची विल्हेवाट लावण्याचा आणि या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करण्याचा अधिकार असेल आणि त्याच्या नावाने त्यास व त्याच्याविरुद्ध दावा दाखल करता येईल.

मंडळाची उद्दिष्टे.

**७.** अध्यापन, संशोधन, विस्तार व सेवा यांद्वारे ज्ञान व समज यांचा प्रसार, निर्मिती व जतन करणे ही सर्वसाधारणपणे मंडळाची उद्दिष्टे असतील आणि विशेषतः ही उद्दिष्टे, पुढीलप्रमाणे असतील :—

(क) पदविका स्तरीय कला शिक्षण उपक्रमांचा विकास करण्याकरिता पर्यवेक्षण करणे, संनियंत्रण करणे, नियमन करणे व योगदान देणे;

(ख) मंडळ निर्धारित करील अशा शर्तींना अधीन राहून, परीक्षांचे आयोजन करणे आणि पदविका व इतर शैक्षणिक विशेषोपाध्या व उपाध्या प्रदान करणे, आणि अशा कोणत्याही पदविका किंवा इतर शैक्षणिक विशेषोपाध्या किंवा उपाध्या विहित रीतीने काढून घेणे किंवा रद्द करणे;

(ग) शिक्षण, प्रशिक्षण, संशोधन, विकास व विस्तार यांद्वारे आणि मंडळास योग्य वाटतील अशा इतर कोणत्याही माध्यमाद्वारे पदविका स्तरीय कला शिक्षणाच्या विकासासाठी सुविधा पुरविणे व संधी उपलब्ध करून देणे;

(घ) दीर्घकालीन आवश्यकतांशी सुसंगत असणारा आणि अपेक्षित बदल व विकास यांना प्रतिसाद देणारा समाजाच्या विद्यमान गरजांशी सुसंबद्ध असणारा पदविका स्तरीय कला शिक्षणाचा अध्ययनक्रम तयार करणे व त्याची अंमलबजावणी करणे;

(ङ) पदविका स्तरीय कला शिक्षणामधील ज्ञानाची अभिवृद्धी करणे आणि समाजाच्या उन्नतीसाठी त्याचा प्रसार करणे;

(च) एकीकडे शैक्षणिक संस्था व संशोधन समुदाय आणि दुसरीकडे उद्योग व शासकीय नियोक्ते यांच्यामध्ये सहकार्य वाढीस लावण्यासाठी व कल्पनांचे आदानप्रदान करण्यासाठी आणि विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकतेस चालना देण्यासाठी एक केंद्र म्हणून सेवा बजावणे;

(छ) अध्ययनशील समाजासाठी पदविका स्तरीय कला शिक्षणाच्या सुविधांचे समन्यायी वाटप करण्यासाठी आणि आधुनिक संपर्क माध्यमे व तंत्रज्ञान यांच्या उचित वापरासह पदविका शिक्षणाचे जाळे विकसित करण्यास चालना देणे;

(ज) कार्यक्षम व संवेदनशील प्रशासन, शास्त्रशुद्ध व्यवस्थापन करण्याची तरतूद करणे आणि अध्यापन, संशोधन व विस्तार संघटनेचा विकास करणे;

(झ) विद्याविषयक उपक्रम व संलग्न अध्ययनक्रम हाती घेऊन आर्थिक स्वयं-निर्भरता निर्माण करणे;

(त्र) विविध राज्य प्राधिकरणे व परिसंस्था यांच्यामध्ये अधिक चांगल्या परस्पर संवादास व समन्वय साधण्यास चालना देणे;

(ट) विद्यार्थ्यांशी संबंधित असलेल्या सर्व शैक्षणिक व इतर बाबींमध्ये एकमेव मार्गदर्शक निकष म्हणून स्पर्धात्मक गुणवत्तेला व उत्कृष्टतेला चालना देण्यासाठी काटेकोर प्रयत्न करणे;

(ठ) उद्योगाच्या गरजा भागविण्यासाठी आणि तंत्रज्ञानामध्ये अभिवृद्धी करण्यासाठी अभ्यासक्रम विकसित करणे किंवा सुधारित करणे;

(ड) अभ्यासक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीची योजना तयार करणे आणि आवश्यक अध्ययन संसाधने विकसित करणे व अध्यापकांना समुचित प्रशिक्षण देणे;

(ढ) शैक्षणिक अध्ययनक्रम, इतर उपक्रम राबविणे आणि अध्यापन व संशोधन करणे आणि दर्जेदार निरंतर अध्ययनक्रम उपलब्ध करून देणे;

(ण) पदविका स्तरीय कला शिक्षणात आणि त्यांच्या आंतर-विद्याशाखीय अभ्यासांत अध्ययन, अध्यापन, क्षमता व कौशल्ये विकासाची तरतूद करणे;

(त) कला शिक्षणातील शिक्षण, अध्यापन व प्रशिक्षण देणे आणि संशोधनासाठी तरतुदी करणे;

(थ) पदविका स्तरीय कला शिक्षणाचे बळकटीकरण करण्यासाठी व नवोपक्रमांसाठी उत्कृष्टता केंद्रे निर्माण करणे;

(द) नाविन्यपूर्ण दृष्टिकोनांसह नवीन व उद्योन्मुख क्षेत्रांमध्ये, कला शिक्षण अध्ययन पाठ्यक्रम सुरू करणे;

(ध) सर्जनशीलता व उद्योजकता विकसित करण्यासाठी व त्याची जोपासना करण्यासाठी शैक्षणिक संरचना अध्ययनाच्या कालमर्यादा व सातत्यपूर्ण मूल्यमापन प्रक्रियांमध्ये सहजता निर्माण करण्यासाठी नाविन्यपूर्ण दृष्टिकोन प्रस्थापित करणे;

(न) गरज असलेल्या क्षेत्रांमध्ये किंवा उद्योगाच्या गरजांभिमुख निरंतर शैक्षणिक अध्ययनक्रम आयोजित करण्यासाठी संस्थांना प्रोत्साहन देणे किंवा मार्गदर्शन करणे;

(प) कोणतीही मालमत्ता, तिच्यातील हितसंबंध किंवा हक्क संपादन करणे, धारण करणे, हस्तांतरण करणे आणि त्याची विल्हेवाट लावणे आणि परिणामकारक कामकाजासाठी त्याची व्यवस्था पाहणे व त्याच्याशी संबंधित कार्यवाही करणे; आणि

(फ) देशातील किंवा देशाबाहेरील संलग्न परिसंस्था, परीक्षा मंडळे, विद्यापीठे, शासकीय शैक्षणिक संस्था, संचालनालये व शासकीय विभाग, इत्यादींसह कला शिक्षण उपक्रमांच्या उन्नतीसाठी सल्लागार, संलग्नता व सहाय्यता सेवा पुरविणे व संपादन करणे.

मंडळाचे अधिकार व कर्तव्ये.

**८.** या अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीनतेने मंडळाचे अधिकार व कर्तव्ये पुढीलप्रमाणे असतील:—

(क) शासनाला व नियामक परिषदेला, सर्वसाधारणपणे पदविका स्तरावरील कला शिक्षणाशी संबंधित धोरण विषयक बाबींवर आणि विशेषकरून, पुढील बाबींवर सल्ला देणे :—

(एक) पदविका स्तरावरील कला शिक्षणात राष्ट्रीय धोरणे व राज्याची धोरणे यांमध्ये समन्वय साधणे;

(दोन) पदविका स्तरावरील कला शिक्षणाचा एकरूप दर्जा राखणे ;

(तीन) कला संस्थांतर्गत परस्पर सहकार्य वाढवणे ;

(चार) उद्योग व परिसंस्था यांच्यातील आंतरक्रियेस चालना देणे ;

(ख) अभ्यासक्रम व पाठ्यक्रम ठरविण्याची मार्गदर्शक तत्त्वे निर्धारित करणे आणि नियमित, कार्यानुभवयुक्त (सॅन्डविच), अंशकालिक, वार्षिक, सहामाही पद्धतीच्या व तत्सम यांसारख्या सर्व प्रकारांकरिता पदविका स्तरावरील कला शिक्षणाचा तपशीलवार अभ्यासक्रम व पाठ्यक्रम देखील तयार करणे ;

(ग) शिक्षक वर्ग, इमारती, फर्निचर, साधने, लेखनसामग्री व पदविका स्तरावरील कला संस्थांना आवश्यक असलेल्या इतर गोष्टी यांच्या संबंधात प्रमाणभूत शर्ती विहित करणे व विनियमित करणे ;

(घ) पदविका स्तरावरील कला पाठ्यक्रमासाठी, पाठ्यपुस्तक व संदर्भ पुस्तक म्हणून कोणतेही पुस्तक विहित करणे व विकसित करणे, किंवा कोणतेही पुस्तक आणि मुद्रित किंवा बिगर मुद्रित साहित्य तयार करणे किंवा तयार करण्याची व्यवस्था करणे, किंवा प्रत्यक्ष किंवा कोणत्याही इतर एजन्सीच्या सहयोगाने ते प्रकाशित करणे ;

(ङ) परीक्षेसाठी नियमित उमेदवारांना प्रवेश देण्यासंबंधीच्या सर्वसाधारण शर्ती विहित करणे आणि ज्या शर्ती पूर्ण केल्यावर उमेदवाराला अशा कोणत्याही परीक्षेसाठी प्रवेश मिळण्याचा आणि त्या परीक्षेला बसण्याचा हक्क प्राप्त होईल अशा पात्रता, उपस्थिती, सत्रातील अभ्यास व वर्तणूक यासंबंधीच्या शर्ती विनिर्दिष्ट करणे ;

(च) पदविकेच्या अंतिम परीक्षेत किंवा मंडळाने आयोजित केलेल्या इतर कोणत्याही परीक्षेत उत्तीर्ण होणा-या उमेदवारांना प्रमाणपत्रे देणे ;

(छ) शिष्यवृत्त्या, अधिछात्रवृत्त्या, विद्यावेतने, पदके, बक्षिसे आणि इतर पारितोषिके सुरू करणे व प्रदान करणे आणि त्याच्या शर्ती विहित करणे ;

(ज) मृत्युपत्रित दान, देणग्या, दाननिधी, विश्वस्तव्यवस्था आणि कोणत्याही मालमत्तेची किंवा तिच्यातील हितसंबंधाची अथवा तिच्यातील हक्काची इतर हस्तांतरणे स्वीकारणे ;

(झ) वरील खंड (ज) मध्ये निर्दिष्ट केलेली कोणतीही मालमत्ता, हितसंबंध किंवा हक्क धारण करणे आणि त्यांचे व्यवस्थापन करणे व त्यासंबंधी व्यवहार करणे ;

(त्र) विहित करण्यात येईल असे शुल्क व शास्ती निश्चित करणे व त्याची मागणी करणे व ती स्वीकारणे ;

(ट) पदविका स्तरावरील कला शिक्षणाचा शैक्षणिक दर्जा राखल्याची व त्यात सुधारणा झाल्याची सुनिश्चिती करण्यासाठी मंडळाच्या प्रादेशिक कार्यालयांकडून विशेष अहवाल व माहिती मागविणे आणि मंडळाने मान्यता दिलेल्या पदविका स्तरावरील कोणत्याही कला परिसंस्थेकडून कोणतीही माहिती मागविणे ;

(ठ) मंडळाने मान्यता दिलेल्या संस्थांतील विद्यार्थ्यांचे शारीरिक, नैतिक व समाज कल्याण यास चालना देण्यासाठी उपाययोजनांची शिफारस करणे आणि त्यांची निवासव्यवस्था, शिस्त यासंबंधी शर्ती विहित करणे ;

(ड) मंडळाशी संबंधित असलेल्या वार्षिक वित्तीय विवरणपत्रास मान्यता देणे आणि वार्षिक अर्थसंकल्प मंजूर करण्यासाठी नियामक परिषदेला शिफारस करणे ;

(ढ) प्रादेशिक कार्यालयांच्या कामकाजाचे सर्वसाधारण निरीक्षण करणे व त्यावर देखरेख ठेवणे आणि त्यांच्या लेख्यांची नियतकालिक तपासणी करणे ;

(ण) कोणत्याही अभिकरणाच्या सहयोगाने अभ्यासक्रम, अध्यापन-अध्ययन प्रक्रिया व परीक्षा पद्धती तयार करण्याच्या, विकसित करण्याच्या, राबविण्याच्या प्रयोजनासाठी सांख्यिकीय व अन्य संशोधन करणे किंवा प्रशिक्षण कार्यक्रम घेणे ;

(त) या अधिनियमाखालील आपली कामे कार्यक्षमरीतीने पार पाडण्यासाठी त्यास आवश्यक वाटतील अशा समित्यांची नेमणूक करणे ;

(थ) या अधिनियमाच्या तरतुदींची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्या प्रयोजनांसाठी विनियम करणे ;

(द) मंडळ, त्याच्या समित्या यांनी अनुसरावयाची कार्यपद्धती आणि या अधिनियमाद्वारे किंवा त्याअन्वये आणि त्याखालील केलेल्या विनियमांन्वये तरतूद केलेली केवळ मंडळ व तिच्या समित्या यांच्याशी संबंधित असणारी इतर कोणतीही बाब त्यांच्याशी संबंधित उपविधी तयार करणे ;

(ध) या अधिनियमाद्वारे किंवा त्याअन्वये त्यास प्रदान करण्यात येतील अशा इतर अधिकारांचा वापर करणे किंवा सोपवण्यात येतील अशी इतर कर्तव्ये पार पाडणे ;

(न) परिसंस्थांना विद्याविषयक स्वायत्तता देणे, स्वायत्ततेचा आढावा घेणे किंवा दिलेली स्वायत्तता रद्द करणे यासाठी नियामक परिषदेच्या मान्यतेने विनियम तयार करणे ;

(प) पदविका स्तरावरील शिक्षण सुधारणे, त्याची व्याप्ती वाढवणे आणि त्याचा विस्तार करणे आणि पदविका स्तरावरील कला शिक्षणाचा दर्जा राखणे व वाढविणे यांसारखी या अधिनियमाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आवश्यक असेल अशा सर्व कृती करणे ;

(फ) कला परिसंस्थांना संलग्नता, अधिस्वीकृती, स्वायत्त दर्जा, सममूल्यता, पात्रता देण्यासाठी आणि संलग्नता, किंवा अधिस्वीकृती किंवा सममूल्यता किंवा स्वायत्त दर्जा किंवा पात्रता यांचे पुनर्विलोकन करण्यासाठी किंवा रद्द करण्यासाठी विनियम करणे ;

(ब) उमेदवारांना परीक्षेसाठी प्रवेश देणे तसेच परिसंस्थांना संलग्नता देणे, अधिस्वीकृती, स्वायत्तता प्रदान करणे, सममूल्यता देणे यांसाठी विहित करण्यात येईल अशा शुल्काची मागणी करणे व ती स्वीकारणे ;

(भ) मंडळाकरिता परीक्षा घेणे ;

(म) परीक्षा घेणे, उमेदवारांच्या प्रगतीचे मूल्यनिर्धारण करणे आणि निकाल संकलित करणे व तो जाहीर करणे यांसाठी प्राश्निक, परीक्षक, नियामक, पर्यवेक्षक आणि इतर आवश्यक कर्मचारीवर्गाची नेमणूक करणे ;

(य) विनियमांनुसार परीक्षेसाठी उमेदवारांना प्रवेश देणे ;

(यक) मंडळाच्या परीक्षा घेण्यासाठी मंडळाच्या अधिकारितेमध्ये केंद्रे उघडणे ;

(यख) परीक्षांना बसलेल्या उमेदवाराचे निकाल निश्चित करण्यात येईल अशा दिनांकास किंवा दिनांकांस जाहीर करणे ;

(यग) गुणवत्तेनुसार उमेदवारांची यादी तयार करणे ;

(यघ) अनुचित मार्गांचा वापर करण्याच्या प्रकरणांवर निर्धारित केलेल्या कार्यपद्धतीनुसार कार्यवाही करणे ;

(यङ) कला परिसंस्थांमधील पदविकास्तरावरील अंतिम परीक्षेसह सर्व परीक्षांमधील विद्यार्थ्यांच्या व परिसंस्थांच्या कामगिरीचे सर्वसाधारण मूल्यमापन करणे ;

(यच) आवश्यक शैक्षणिक दर्जा न राखणा-या मान्यताप्राप्त परिसंस्थांबाबत त्या प्रयोजनासाठी घटित केलेल्या संबंधित समितीकडून विशेष अहवाल व माहिती मागवणे आणि निकृष्ट शैक्षणिक निकाल आणि गंभीर स्वरूपाच्या शैक्षणिक अनियमितता या प्रकरणी, शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या प्रशासनिक आदेशान्वये अशा परिसंस्थेला देण्यात आलेली मान्यता काढून घेण्याची शिफारस शासनास करणे ;

(यछ) शासनाने मान्यता दिलेल्या परिसंस्थांना, परीक्षा घेण्यामध्ये सहकार्य करण्याबद्दल फर्मावणे आणि ज्या परिसंस्था परीक्षा घेण्यासाठी आवश्यक असलेल्या सुविधा मंडळाकडे सोपवण्यात कसूर करतील अशा कोणत्याही परिसंस्थांचे विशेषाधिकार, असे का आदेश काढण्यात येऊ नयेत याबाबत त्यांना कारणे दाखविण्याची वाजवी संधी दिल्यानंतर काढून घेणे; आणि

(यज) मंडळाच्या कार्यालयाचे कामकाज किंवा प्रादेशिक कार्यालयांचे कामकाज यांसाठी आवश्यक असलेली कोणतीही मालमत्ता किंवा पायाभूत सुविधा निर्माण करणे, तीवर मालकी असणे, ती धारण करणे किंवा भाड्याने घेणे ;

(यझ) शैक्षणिक कामगिरीचे नियोजन व संनियंत्रण करणे ;

(यञ) गरजांवर आधारित अभ्यासक्रम, स्वयंरोजगारासाठी विशेष पाठ्यक्रम, ग्रामीण, वंचित व्यक्ती व महिलांसाठी अभ्यासक्रम प्रस्तावित करणे ;

(यट) इच्छुक परिसंस्थांना स्वायत्तता देण्याचे प्रस्तावित करणे ;

(यठ) शासकीय परिसंस्थांची मागील कामगिरी विचारात घेऊन, शासकीय संस्थांचा, आदर्श संस्था किंवा उत्कृष्टता केंद्र म्हणून दर्जा वाढ करणे ;

(यड) संलग्न परिसंस्थांच्या संलग्न पाठ्यक्रमांचे शुल्क निश्चित करण्याचे आणि त्याचे संकलन करण्याचे आणि त्यांच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींचे विनियमन करण्यासाठी तरतूद करणे.

मंडळाच्या सदस्यांचा पदावधी व त्यांचे भत्ते.

**९.** (१) मंडळाच्या पदसिद्ध सदस्याव्यतिरिक्त अन्य सदस्य हा, ज्या दिनांकास त्याचे नाव **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात आले असेल त्या दिनांकापासून, तीन वर्षांच्या मुदतीसाठी पद धारण करील.

(२) मावळत्या सदस्यांचा पदावधी हा, त्याच्या उत्तराधिका-यांची नावे ज्या दिनांकास **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात येतील त्या दिनांकाच्या लगतपूर्वीच्या दिवसापर्यंत चालू राहील व त्या दिवशी संपेल.

(३) सदस्य, विनियमांद्वारे विहित करण्यात येतील असे पूरक भत्ते मिळण्यास हक्कदार असतील.

मंडळाचा अध्यक्ष व सदस्य यांची अपात्रता.

**१०.** एखादी व्यक्ती ही, पुढील बाबतीत मंडळाचा किंवा या अधिनियमान्वये नेमलेल्या कोणत्याही समितीचा अध्यक्ष किंवा सदस्य म्हणून नेमली जाण्यास, किंवा नामनिर्देशित केली जाण्यास किंवा असा अध्यक्ष किंवा सदस्य म्हणून चालू राहण्यास अपात्र ठरेल,—

(क) जर तिचा किंवा तिच्या भागीदाराचा, मंडळाच्या आदेशावरून केलेल्या कोणत्याही कामात किंवा मंडळाच्या वतीने केलेल्या कोणत्याही करारात प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध असेल तर ;

(ख) जर तिच्याविरुद्ध कलम १३ अन्वये पदावरून काढून टाकण्याचा आदेश देण्यात आला आहे, ती व्यक्ती असेल तर :

परंतु, ज्या व्यक्तीविरुद्ध असा आदेश देण्यात आला असेल ती व्यक्ती, तिला पदावरून काढून टाकण्यात आल्याच्या दिनांकापासून पाच वर्षांचा किंवा शासन विनिर्दिष्ट करील असा त्यापेक्षा कमी कालावधी लोटलेला असेल तर, या खंडान्वये अपात्र झाली असल्याचे मानण्यात येणार नाही.

नैमित्तिक रिक्त पदे.

**११.** नियामक परिषदेच्या किंवा मंडळाच्या, किंवा मंडळाने घटित केलेल्या कोणत्याही समितीच्या सदस्यांची सर्व नैमित्तिक रिक्त पदे, नामनिर्देशनाद्वारे किंवा, यथास्थिति, नेमणुकीद्वारे शक्य तितक्या लवकर, भरण्यात येतील; आणि त्या नैमित्तिक रिक्त पदावर नामनिर्देशित केलेली किंवा नेमणूक केलेली व्यक्ती, ज्या सदस्याच्या जागी तिला नामनिर्देशित केले किंवा नेमणूक केली असेल त्या सदस्याचे पद रिक्त झाले नसते तर तिने जोपर्यंत पद धारण केले असते तोपर्यंत पद धारण करील.

सदस्याचा राजीनामा.

**१२.** नियामक परिषदेच्या किंवा मंडळाच्या पदसिद्ध सदस्याव्यतिरिक्त, इतर सदस्यास, नियामक परिषदेच्या अध्यक्षाकडे किंवा यथास्थिति, मंडळाच्या अध्यक्षपदीय व्यक्तीकडे, लेखी राजीनामा देऊन कोणत्याही वेळी आपल्या पदाचा राजीनामा देता येईल ; आणि मंडळाच्या अध्यक्षास, किंवा यथास्थिति, अध्यक्षपदीय व्यक्तीस असा राजीनामा मिळाल्याबरोबर अशा सदस्याने त्याचे पद रिक्त केले असल्याचे मानण्यात येईल.

सदस्यास काढून टाकणे.

**१३.** (१) शासनास, नियामक परिषदेच्या किंवा मंडळाच्या शिफारशीवरून आणि त्यास करणे योग्य वाटेल अशी आणखी चौकशी केल्यानंतर, आदेशाद्वारे, नियामक परिषदेच्या किंवा मंडळाच्या अथवा त्याच्या कोणत्याही समितीच्या कोणत्याही सदस्यास, जर असा सदस्य, —

(क) नैतिक अधःपतनाचा अंतर्भाव असलेल्या कोणत्याही अपराधाबद्दल कोणत्याही न्यायालयाकडून दोषसिद्ध ठरविण्यात आला असेल तर;

(ख) अविमुक्त नादार झाला असेल तर;

(ग) विकल मनाचा असेल व सक्षम न्यायालयाने तो तसा असल्याचे घोषित केलेले असेल तर; किंवा

(घ) नियामक परिषदेच्या व मंडळाच्या ध्येयांना व उद्दिष्टांना हानिकारक ठरेल अशा रीतीने वागत असेल तर,

काढता येईल :

परंतु, अशी शिफारस का करण्यात येऊ नये किंवा असा आदेश का काढण्यात येऊ नये याचे कारण दाखविण्याची वाजवी संधी त्याला दिल्याशिवाय, मंडळ किंवा नियामक परिषद अशी कोणतीही शिफारस करणार नाही किंवा खंड (घ) अन्वये शासन कोणताही आदेश काढणार नाही.

(२) शासनाला, त्याच्या मते ज्या सदस्याच्या कृती, नियामक परिषदेचे किंवा मंडळाचे किंवा समितीचे कामकाज सुरळीतपणे चालण्यास हानिकारक असतील किंवा त्यात अडथळा करत असतील, अशा, नियामक परिषदेच्या किंवा मंडळाच्या अथवा त्याच्या कोणत्याही समितीच्या नामनिर्देशित केलेल्या किंवा नियुक्त केलेल्या सदस्यास, आदेशाद्वारे, स्वतः होऊन काढून टाकता येईल :

परंतु, त्याच्याविरुद्ध असा आदेश का काढण्यात येऊ नये याचे कारण दाखविण्याची वाजवी संधी त्याला देण्यात आल्याशिवाय, अशा कोणत्याही सदस्याला पदावरून काढून टाकण्यात येणार नाही.

(३) पोट-कलमे (१) व (२) यात काहीही अंतर्भूत असले तरी, नियामक परिषदेचा किंवा मंडळाचा नामनिर्देशित सदस्य, शासनाची मर्जी असेल तो पर्यंत पद धारण करील आणि शासनास योग्य वाटेल तेव्हा कोणत्याही वेळी त्यास पदावरून काढता येईल.

मंडळाच्या बैठकी.

**१४.** (१) मंडळ प्रत्येक वर्षात चार पेक्षा कमी नसतील इतक्या वेळा बैठका घेईल, आणि लागोपाठच्या दोन बैठकींदरम्यान तीन महिन्यांपेक्षा अधिक कालावधी असणार नाही.

(२) मंडळाच्या अध्यक्षास, निकडीच्या परिस्थितीत तशी आवश्यकता असल्यास, कोणत्याही वेळी, बैठक बोलावता येईल आणि मंडळाच्या एकूण सदस्यांपैकी एक-तृतीयांशपेक्षा कमी नसतील इतक्या सदस्यांनी लेखी विनंती केल्यावर, अध्यक्ष, त्यास अशी विनंती मिळाल्यानंतर एकवीस दिवसानंतरच्या नसेल अशा दिनांकास मंडळाची विशेष बैठक बोलावील.

अपात्र ठरल्यामुळे अध्यक्षाचे किंवा सदस्याचे पद रिक्त होणे.

**१५.** मंडळाचा किंवा त्याच्या कोणत्याही समितीचा अध्यक्ष किंवा सदस्य हा, कलम १० मध्ये नमूद केलेल्या अपात्रतांपैकी कोणत्याही अपात्रतेस अधीन झाला तर, शासनाकडून त्याचे पद रिक्त झाल्याचे जाहीर करण्यात येईल.

विना परवानगी अनुपस्थित राहिल्यामुळे सदस्याचे पद रिक्त होणे.

**१६.** मंडळाचा नामनिर्देशित केलेला किंवा नेमणूक केलेला सदस्य, मंडळाच्या परवानगीशिवाय, मंडळाच्या लागोपाठच्या तीन बैठकींना अनुपस्थित राहिला तर, त्यानंतर, त्याचे पद रिक्त होईल आणि तसे रिक्त झाल्याचे अध्यक्षाकडून जाहीर करण्यात येईल.

**१७.** अध्यक्षाचे किंवा सदस्याचे पद, कलम १५ किंवा यथास्थिति, कलम १६ अन्वये रिक्त झाले आहे किंवा कसे यासंबंधात कोणताही वाद उद्‌भवल्यास, या प्रकरणातील शासनाचा निर्णय अंतिम असेल.

रिक्त पदाच्या प्रश्नावरील निर्णय.

**१८.** नियामक परिषदेची किंवा मंडळाची अथवा त्याच्या कोणत्याही समितीची कोणतीही कृती किंवा कामकाज हे, अशा नियामक परिषदेत, मंडळामध्ये किंवा समितीत कोणतेही पद रिक्त होते किंवा तिच्या रचनेत कोणताही दोष होता केवळ या कारणावरून विधिअग्राह्य ठरणार नाही.

रिक्त जागा असल्यामुळे किंवा रचनेतील दोषांमुळे कृती किंवा कामकाज विधिअग्राह्य न होणे.

**१९.** नियामक परिषदेस किंवा मंडळास, त्याच्या मते जी व्यक्ती कला शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ आहे अशा कोणत्याही व्यक्तीस किंवा शासनाच्या कोणत्याही अधिका-यास, ती तज्ज्ञ व्यक्ती किंवा तो अधिकारी, ज्या विषयाशी संबंधित असेल तो विषय जर मंडळाच्या किंवा त्याच्या समितीच्या बैठकीमध्ये चर्चेसाठी किंवा विचारार्थ मांडला जाण्याचा संभव असेल तर, त्यांच्या किंवा त्याच्या समितीच्या बैठकीस उपस्थित राहण्यासाठी निमंत्रित करता येईल.

तज्ज्ञांना व अधिका-यांना बैठकीस बोलविण्याचा अधिकार.

**२०.** (१) मंडळ, पुढील समित्या घटित करील :—

समित्या घटित करणे.

(क) विद्याविषयक समिती ;

(ख) वित्त समिती ;

(ग) पाठ्यक्रम समिती ;

(घ) समतुल्यता समिती ;

(ङ) परीक्षा समिती ;

(च) शुल्क निश्चिती समिती.

(२) मंडळ, त्यांची कार्ये कार्यक्षमरीत्या पार पाडण्याकरिता त्यास आवश्यक वाटेल, अशा इतर समित्या घटित करील.

(३) मंडळाने घटित केलेल्या प्रत्येक समितीच्या सदस्यांची संख्या, तिच्या सदस्यांचा पदावधी व अशा समितीने पार पाडावयाची कर्तव्ये व कार्ये, विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

**२१.** महाराष्ट्र राज्यात कला शिक्षणाला चालना देण्याच्या कोणत्याही योजनेच्या बाबतीत, या अधिनियमामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांपैकी कोणत्याही प्रयोजनांकरिता, मंडळाच्या स्थापनेपूर्वी राज्य शासनाद्वारे किंवा विद्यमान कला संचालनालयाद्वारे, राज्य शासनाबरोबर किंवा विद्यमान कला संचालनालयाबरोबर अथवा शासनाकरिता किंवा विद्यमान कला संचालनालयाकरिता केलेली सर्व दायित्वे, केलेले सर्व करार आणि करण्याचे वचनबद्ध असलेल्या इतर सर्व बाबी व गोष्टी या, मंडळाद्वारे किंवा या मंडळाबरोबर किंवा या मंडळाकरिता, केलेली दायित्वे, केलेले करार किंवा करण्याचे वचनबद्ध असलेल्या बाबी किंवा गोष्टी असल्याचे मानण्यात येईल आणि त्यानुसार, शासनाद्वारे किंवा यथास्थिति, विद्यमान संचालनालयाद्वारे किंवा त्यांच्याविरुद्ध केलेले सर्व दावे, दाखल केलेले सर्व किंवा दाखल करण्यात आले असतील असे चालविण्यात आलेले किंवा चालविण्यात येऊ शकतील असे दावे, केलेले सर्व वाद किंवा कायदेशीर कारवाई, कारवाया मंडळाकडून किंवा मंडळाविरुद्ध चालू ठेवण्यात येतील किंवा दाखल करण्यात येतील.

हा अधिनियम लागू असेल अशा बाबींसंबंधातील शासनाची दायित्वे मंडळाने हाती घेणे.

संचालकाची नियुक्ती.

**२२.** मंडळाचा एक संचालक असेल. शासन, कला संचालनालयाच्या सहसंचालकाची मंडळाचा संचालक म्हणुन नियुक्त करील.

मंडळाच्या संचालकाचे अधिकार व कर्तव्ये.

**२३.** (१) या अधिनियमाच्या तरतुदी आणि त्याखाली केलेले विनियम व उपविधी यांचे पालन केले जात असल्याची सुनिश्चिती करणे हे, मंडळाच्या संचालकाचे कर्तव्य असेल आणि त्यास, या प्रयोजनासाठी आवश्यक ते सर्व अधिकार असतील.

(२) संचालक, शासनाने व नियामक परिषदेने दिलेल्या निदेशांचे काटेकोरपणे अनुपालन किंवा, यथास्थिति, अंमलबजावणी केली जात आहे याची सुनिश्चिती करील.

(३) जेव्हा कोणतीही बाब विनियमांद्वारे किंवा उपविधींद्वारे विनियमित करणे आवश्यक असेल, परंतु, त्याबाबतीत कोणतेही विनियम किंवा उपविधी केलेले नसतील त्याबाबतीत, संचालकास, त्यास आवश्यक वाटतील असे निदेश काढून त्या त्या वेळी ती बाब विनियमित करता येईल, आणि त्यानंतर ते निदेश मान्यतेसाठी लवकरात लवकर पुढील बैठकीमध्ये मंडळासमोर ठेवता येतील :

परंतु, असे निदेश हे, ते काढल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत विनियमांमध्ये किंवा, यथास्थिति, उपविधींमध्ये रूपांतरित करावयाचे असून तसे करण्यास निष्फळ ठरल्यास, असे निदेश आपोआप व्यपगत होतील, परंतु, त्याद्वारे केलेल्या कारवाईस बाधा पोहचणार नाही.

(४) पोट-कलमे (१) व (२) खालील उद्देशित कर्तव्ये पार पाडण्याच्या प्रयोजनार्थ, संचालकास, सचिवाचे किंवा त्याला योग्य वाटेल अशा, इतर अधिका-याचे सहाय्य घेता येईल.

(५) संचालकाच्या मते, ज्या प्रसंगी तात्काळ कारवाई करणे आवश्यक आहे अशा निकडीच्या प्रसंगी, संचालक, त्यास आवश्यक वाटेल अशी कारवाई करील आणि त्यानंतर, त्याच्या कारवाईचा अहवाल मंडळाला, त्याच्या पुढील बैठकीमध्ये सादर करील.

(६) संचालक, विहित करण्यात येतील अशा इतर अधिकारांचा वापर करील आणि अशी इतर कर्तव्ये पार पाडील.

सचिव, अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती, अधिकार व कर्तव्ये.

**२४.** (१) शासन, मंडळाच्या शिफारशीवरुन, मंडळासाठी आवश्यक असेल अशा संख्येतील प्रशासकीय व तांत्रिक अधिकारी आणि कर्मचारी यांची नियुक्ती करील.

(२) अशा प्रकारे नियुक्त केलेले अधिकारी व कर्मचारी, मंडळाच्या संचालकाने, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशांद्वारे अनुक्रमे, त्यांना प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करतील आणि सोपविलेली कर्तव्ये पार पाडतील.

(३) मंडळाचा एक सचिव असेल, ज्याची शासनाद्वारे नियुक्ती करण्यात येईल.

(४) अध्यक्षांच्या नियंत्रणास अधीन राहून, मंडळाचा सचिव, मंडळाचा कार्यकारी अधिकारी असेल आणि तो, मंडळाचा अभिलेख, सामाईक शिक्का व अशा इतर मालमत्ता यांचा अभिरक्षक असेल आणि मंडळाच्या अंतर्गत त्या त्या वेळी सेवा करणारे इतर सर्व अधिकारी व कर्मचारी, त्यास दुय्यम असतील.

(५) अध्यक्षांच्या मान्यतेस अधीन राहून, सचिव, मुख्यत्वेकरून, पुढील अधिकारांचा वापर करील आणि पुढील कर्तव्ये पार पाडील :—

(क) प्राधिकरणांनी, या अधिनियमान्वये, वेळोवेळी मान्य केलेले उप-विधी व विनियम यांचे हस्तपुस्तीका तयार करणे व ते अद्ययावत करणे ;

(ख) प्राधिकरणांच्या आणि मंडळाच्या समित्यांच्या निर्णयांच्या अधीन राहून, मंडळाच्या वतीने करार करणे, दस्तऐवजांवर स्वाक्षरी करणे आणि अभिलेखांचे प्रमाणीकरण करणे ;

(ग) या अधिनियमाद्वारे किंवा त्या अन्वये विहित केलेली अथवा संचालकाने, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, वेळोवेळी, प्रदान केलेल्या अशा इतर अधिकारांचा वापर करणे आणि सोपविलेली अशी इतर कर्तव्ये पार पाडणे.

## प्रकरण चार

## परवानगी, संलग्नता, स्वायत्त दर्जा व सममूल्यता प्रदान करणे.

**२५.** (१) कला शिक्षण देणारे परिसंस्थेचे व्यवस्थापन, संलग्नता मिळण्याकरिता मंडळाद्वारे विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा रीतीने, मंडळाकडे अर्ज करील. परिसंस्थेची संलग्नता.

(२) संलग्नीकरणासाठी अर्ज करणारे व्यवस्थापन, पुढील शर्तींचे अनुपालन करील व तशा अर्थाची हमी देईल :—

(क) अधिनियम आणि त्याखालील विनियम यांच्या तरतुदींचे आणि मंडळाच्या स्थायी आदेशांचे व निदेशांचे पालन करण्यात येईल ;

(ख) अभ्यास पाठ्यक्रमांसाठी प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांची संख्या, मंडळाने व शासनाने, वेळोवेळी विहित केलेल्या मर्यादांपेक्षा अधिक असणार नाही ;

(ग) विहित करण्यात येईल त्याप्रमाणे इमारती, कार्यशाळा, ग्रंथालये, पुस्तके, अध्यापनासाठी व संशोधनासाठी आवश्यक असलेली साधनसामग्री, वसतिगृहे, व्यायामशाळा यांसारख्या सुयोग्य व पर्याप्त भौतिक सुविधा असतील ;

(घ) परिसंस्थेची वित्तीय संसाधने ही, ती नियमितपणे चालविण्यासाठी व तिचे कामकाज करण्यासाठी पुरेशी तरतूद करणारी असेल ;

(ङ) मान्यताप्राप्त संलग्न परिसंस्थांच्या अध्यापक व अध्यापकेतर कर्मचा-यांची संख्या व अर्हता आणि संलग्न परिसंस्थांच्या कर्मचा-यांची वित्तलब्धी आणि त्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती या, मंडळाद्वारे व नियामक प्राधिकरणाद्वारे विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील आणि त्या, अभ्यास पाठ्यक्रम, अध्यापन किंवा प्रशिक्षण किंवा संशोधन कार्यक्षमतेने चालण्यासाठी योग्य ती तरतूद करण्यास पुरेशा असतील ;

(च) संलग्न करावयाच्या परिसंस्थेच्या सर्व अध्यापक व अध्यापकेतर कर्मचा-यांच्या सेवा आणि त्या परिसंस्थेच्या सुविधा, परीक्षा घेण्यासाठी व मूल्यमापनासाठी आणि मंडळाच्या इतर कार्यक्रमांना चालना देण्यासाठी उपलब्ध करून देण्यात येतील ;

(छ) या अधिनियमाच्या तरतुदी आणि विनियम या अन्वये, मंडळाच्या संचालकाने व इतर अधिका-यांनी त्यांना प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, दिलेले निदेश व आदेश यांचे अनुपालन करण्यात येईल ;

(ज) शासनाच्या व समुचित नियामक प्राधिकरणाच्या पूर्वपरवानगीशिवाय, व्यवस्थापनामध्ये कोणताही बदल करण्यात येणार नाही किंवा त्याचे हस्तांतरण करण्यात येणार नाही ;

(झ) शासनाच्या व समुचित नियामक प्राधिकरणाच्या पूर्वपरवानगीशिवाय परिसंस्था बंद करण्यात येणार नाही ;

(ञ) कलम ३२ किंवा, यथास्थिति, कलम ३६ या अन्वये कला परिसंस्थेची संलग्नता रद्द केल्याच्या किंवा मान्यता काढून घेतल्याच्या किंवा बंद केल्याच्या प्रसंगी, शासनाने सहायक अनुदान म्हणून प्रदान केलेल्या रकमेमधून बांधण्यात किंवा निर्माण करण्यात आलेल्या इमारती व साधनसामग्री यांसह परिसंस्थेच्या सर्व मत्ता शासनाकडे निहित होतील.

(३) शासनाने, कला संचालनालयाने किंवा इतर कोणत्याही नियामक प्राधिकरणाने ज्या व्यवस्थापनाला किंवा कला परिसंस्थेला मान्यता दिलेली आहे ते व्यवस्थापन किंवा कला परिसंस्था, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून एक वर्षाच्या कालावधीत वरील पोट-कलम (१) व (२) आणि कलम २७ या अन्वये तरतूद केलेल्या रीतीने, संलग्नतेसाठी मंडळाकडे अर्ज करतील, तसे करण्यास निष्फळ ठरल्यास, अशा व्यवस्थापनाची, किंवा यथास्थिति, कला परिसंस्थांची मान्यता रद्द करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल :

परंतु, ज्याची मान्यता रद्द करण्यात आली आहे, असे व्यवस्थापन किंवा यथास्थिति, अशी परिसंस्था, कोणत्याही पाठ्यक्रमांसाठी नवीन विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यासाठी पात्र असणार नाहीत :

परंतु आणखी असे की, अशा व्यवस्थापनाची किंवा यथास्थिती, परिसंस्थांची मान्यता रद्द केल्यामुळे ज्या पाठ्यक्रमांसाठी विद्यार्थ्यांना प्रवेश दिला असेल त्या विद्यार्थ्यांच्या शेवटच्या तुकडीचा पाठ्यक्रम पूर्ण होईपर्यंत विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर कोणताही परिणाम होणार नाही.

(४) दुस-या प्राधिकरणाचा, मंडळाचा किंवा विद्यापीठाचा भाग असलेल्या परिसंस्थेची संलग्नता, त्या प्राधिकरणाकडून, मंडळाकडून किंवा विद्यापीठाकडून ना-हरकत प्रमाणपत्र मिळाल्याशिवाय, दिली जाणार नाही :

परंतु, अशा परिसंस्थेत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना मंडळाकडून किंवा शासनाकडून कोणत्याही स्वरूपाच्या वित्तीय सहाय्याची मागणी करता येणार नाही आणि मंडळ किंवा शासन, अशा विद्यार्थ्यांना कोणतेही वित्तीय सहाय्य देण्यास पात्र असणार नाही.

परवानगी देण्याची कार्यपद्धती.

**२६.** (१) नवीन परिसंस्था सुरू करण्यासाठी परवानगी मागणारे व्यवस्थापन, शैक्षणिक वर्षाच्या अनुसार, प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी मंडळाने घोषित केलेल्या शैक्षणिक वेळापत्रकानुसार, मंडळाच्या सचिवाकडे विहित नमुन्यात अर्ज करील.

(२) पोट-कलम (३) खालील वेळापत्रकामध्ये घोषित केलेल्या कालमर्यादेच्या आत, प्राप्त झालेल्या अशा सर्व अर्जांची, मंडळाकडून छाननी करण्यात येईल आणि ते उक्त वेळापत्रकामध्ये नमूद केल्याप्रमाणे, अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापासून पंचेचाळीस दिवसांच्या आत, शासनाकडे पाठविण्यात येतील.

(३) मंडळाने शिफारस केलेल्या अर्जांपैकी, राज्य शासनास, शासनाची व केंद्र सरकारची धोरणे, नवीन संस्था सुरू करण्यासाठी परवानगी मागणा-या व्यवस्थापनाची योग्यता आणि कला शिक्षणाच्या परिसंस्थांच्या ठिकाणासंबंधातील राज्यस्तरीय प्राधान्यक्रम विचारात घेऊन, त्याच्या स्वेच्छानिर्णयानुसार, त्यास योग्य व उचित वाटेल अशा परिसंस्थांना, मंडळाकडून शिफारस प्राप्त झाल्यापासून, तीस दिवसांच्या आत, परवानगी देता येईल. राज्य शासनाकडून, अशा मान्यतेविषयी मंडळाला कळविण्यात येईल. शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभानंतर दिलेल्या मान्यता, मंडळाकडून केवळ त्यानंतरच्या शैक्षणिक वर्षातच अंमलात आणल्या जातील :

परंतु, कला शिक्षणाच्या नवीन परिसंस्था सुरू करण्यासाठी, मंडळाने शिफारस न केलेल्या कोणत्याही अर्जास, अपवादात्मक परिस्थितीमध्ये व कारणे लेखी नमूद करून, शासनाकडून मान्यता देता येईल.

(४) नवीन कला शिक्षण परिसंस्था सुरू करण्यासाठी परवानगी देण्याकरिता राज्य शासनाकडून थेटपणे कोणताही अर्ज दाखल करून घेण्यात येणार नाही.

(५) या कलमामध्ये विनिर्दिष्ट केलेली कार्यपद्धती, नवीन पाठ्यक्रम, अतिरिक्त विद्याशाखा, नवीन विषय, अतिरिक्त तुकड्या सुरू करणे, नावात बदल करणे आणि ठिकाणात बदल करणे यास परवानगी देण्याकरिता, योग्य त्या फेरफारांसह, लागू असेल.

संलग्नतेची कार्यपद्धती.

**२७.** (१) जेव्हा आवश्यक असेल तेव्हा, नवीन परिसंस्था सुरू करण्याकरिता कलम २६ अन्वये शासनाकडून परवानगी मिळाल्यावर आणि नियामक प्राधिकरणाच्या मान्यतेनंतर, मंडळ, त्या परिसंस्थेने करारनिविष्ट केलेल्या शर्तींची पूर्तता केली आहे किंवा कसे आणि ती कोणत्या मर्यादेपर्यंत केली आहे ते विचारात घेतल्यानंतर, पोट-कलम (२) मध्ये दिलेल्या कार्यपद्धतीचे अनुसरण करून, परिसंस्थेस पहिल्या वेळीस संलग्नता देण्याबाबत विचार करील. या संबंधातील मंडळाचा निर्णय अंतिम असेल.

(२) संलग्नता देण्याचा अर्ज विचारात घेण्याच्या प्रयोजनार्थ, मंडळ, त्या प्रयोजनासाठी त्याने घटित केलेल्या समितीकडून चौकशी करण्याची व्यवस्था करील.

(३) मंडळ,—

(क) संलग्नता द्यावी किंवा नाकारावी ;

(ख) संलग्नता पूर्णतः द्यावी की अंशतः द्यावी ;

(ग) विषय, अभ्यास पाठ्यक्रम व प्रवेश द्यावयाच्या विद्यार्थ्यांची संख्या ;

(घ) अशी संलग्नता देण्यासाठी विहित केलेल्या शुल्कांसह, संलग्नता देताना करारनिविष्ट करता येतील अशा, कोणत्याही असल्यास, शर्ती, ठरवील.

(४) पोट-कलम (२) अन्वये घटित केलेल्या समितीचा सदस्य-सचिव, जर संलग्नतेचा अर्ज मंजूर केला असेल तर,—

(क) संलग्नतेसाठी मान्यता दिलेले विषय व पाठ्यक्रम ;

(ख) प्रवेश द्यावयाच्या विद्यार्थ्यांची संस्था ;

(ग) ज्या शर्तींची पूर्तता करण्यास अधीन राहून, मान्यता दिलेली असेल त्या, कोणत्याही असल्यास, शर्ती,

यासंबंधातील माहितीसह संबंधित परिसंस्थेच्या व्यवस्थापनास मंडळाचा निर्णय कळवील आणि त्याची प्रत, कला संचालनालयास पाठवील.

(५) मंडळाकडून परिसंस्थेला प्रारंभिक संलग्नता देण्यात आल्याखेरीज, परिसंस्था, कोणत्याही विद्यार्थ्याला प्रवेश देणार नाही.

(६) पोट-कलमे (१) ते (४) मध्ये निर्दिष्ट केलेली कार्यपद्धती, योग्य त्या फेरफारांसह, संलग्नता चालू ठेवण्याचा विचार करण्यासाठी, वेळोवेळी लागू होईल.

संलग्नता चालू ठेवणे.

**२८.** संलग्न परिसंस्थेस, ज्याच्यासाठी संलग्नता देण्यात आली होती त्या पाठ्यक्रमांची संलग्नता पुढे चालू ठेवण्यासाठी अशा संलग्नतेच्या समाप्तीच्या दिनांकापूर्वी सामान्यतः सहा महिने अगोदर अर्ज करता येईल. मंडळ, संलग्नता चालू ठेवण्यासाठी कलमे २५, २६ व २७ यांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कार्यपद्धतीचे, जेथवर ती संलग्नता देण्याच्या संबंधात लागू असेल तेथवर, पालन करील.

संलग्नतेचा विस्तार.

**२९.** संलग्न परिसंस्थेस अतिरिक्त पाठ्यक्रमांकरिता संलग्नतेसाठी अर्ज करता येईल. मंडळ, अतिरिक्त अभ्यास पाठ्यक्रमाच्या संलग्नतेसाठी कलमे २५, २६ व २७ यांमध्ये विनिर्दिष्ट कार्यपद्धतीचे, जेथवर ती संलग्नता विस्तारित करण्याच्या संबंधात लागू असेल तेथवर, पालन करील.

कायमस्वरूपी संलग्नता व मान्यता.

**३०.** परिसंस्था म्हणून कमीत कमी सहा वर्षे काम करीत असलेल्या संलग्न परिसंस्थेला, कायमस्वरूपी संलग्नतेसाठी अर्ज करता येईल. मंडळ, अर्जावर विचार करील आणि त्याची छाननी करील. आणि संलग्न परिसंस्था, संलग्नतेच्या सर्व शर्तींचे समाधानकारकपणे पूर्तता करीत आहे आणि मंडळाने वेळोवेळी विहित केलेला उच्च शैक्षणिक व प्रशासकीय दर्जा प्राप्त केलेला आहे त्याची याबद्दल मंडळाची खात्री पटली तर, मंडळ, अशा परिसंस्थेला कायमस्वरूपी संलग्नता देईल.

परिसंस्थांची तपासणी व अहवाल.

**३१.** (१) परिसंस्थेचा विद्याविषयक दर्जा व विद्याविषयक प्रशासनाचा दर्जा याबाबत निर्णय घेणे मंडळाला शक्य व्हावे म्हणून मंडळ, निदेश देईल असे अहवाल, विवरणे व इतर तपशील प्रत्येक संलग्न परिसंस्था सादर करील.

(२) संचालक, त्याने त्याबाबतीत नियुक्त केलेल्या एका किंवा अधिक समित्यांकडून प्रत्येक तीन वर्षांतून किमान एकदा प्रत्येक संलग्न परिसंस्थेची तपासणी करण्याची व्यवस्था करील.

संलग्नता किंवा मान्यता काढून घेणे.

**३२.** (१) जर संलग्न परिसंस्थेने, कलम २५ मध्ये तरतूद केलेल्या संलग्नतेच्या शर्तीचे अनुपालन करण्यात कसूर केली तर, मंडळ, संलग्नतेद्वारे, परिसंस्थेस प्रदान केलेले विशेषाधिकार अंशतः किंवा संपूर्णतः का काढून घेण्यात येऊ नयेत किंवा त्यात फेरबदल का करण्यात येऊ नयेत, याबाबतची कारणे दाखविण्यासाठी व्यवस्थापनाला नोटीस निर्गमित करू शकेल.

(२) मंडळ, उपरोल्लिखित कारवाई करण्याचे त्याने का प्रस्तावित केले आहे त्याची कारणे नमूद करील आणि नोटिशीची एक प्रत, परिसंस्थेच्या प्राचार्यास किंवा प्रमुखास पाठवील. मंडळ, नोटिशीच्या उत्तरादाखल व्यवस्थापनाने किती कालावधीत आपले लेखी निवेदन सादर केले पाहिजे तो पंधरा दिवसांपेक्षा कमी नसेल इतका कालावधीदेखील नोटिशीत विनिर्दिष्ट करील.

(३) असे लेखी निवेदन मिळाल्यावर किंवा पोट-कलम (१) अन्वये काढलेल्या नोटिशीत विनिर्दिष्ट केलेला कालावधी संपल्यावर, मंडळ, असे विशेषाधिकार काढून घेण्यासाठी किंवा त्यात फेरबदल करण्यासाठी कोणतीही असल्यास कारवाई हाती घेईल.

(४) मंडळ, परिसंस्थेमध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेऊन, संलग्नता निलंबित करण्याची किंवा काढून घेण्याची कारवाई करण्यासाठी अथवा याबाबतीत हाती घ्यावयाची इतर कोणतीही उचित कारवाई शासनाकडे शिफारस करील आणि त्यानंतर शासन, त्या शिफारशीची अंमलबजावणी करण्याची कार्यवाही करील.

स्वायत्त दर्जा प्रदान करणे.

**३३.** (१) स्वायत्त दर्जाकरिता आपण पात्र आहोत असे समजणा-या मान्यताप्राप्त कला परिसंस्था, ज्या वर्षापासून स्वायत्त दर्जा मिळण्यासाठी अर्ज करावयाचा असेल त्यावर्षाच्या आधीच्या वर्षाच्या ३१ ऑगस्ट रोजी किंवा त्यापूर्वी मंडळाच्या सचिवाकडे, मंडळाने विहित केलेल्या नमुन्यामध्ये अर्ज करील.

(२) सचिव, अर्ज विद्या समितीपुढे ठेवील आणि विद्या समिती, अर्जाची छाननी करील आणि वर नमूद केलेले निकष विचारात घेऊन, अर्ज विचारात घेण्यासाठी हे सकृतदर्शनी प्रकरण आहे किंवा कसे, याबाबत निर्णय घेईल. जर ते प्रथमदर्शनी प्रकरण आहे असा निर्णय समितीने घेतला तर, ती, कला परिसंस्थेचा प्राचार्य, अध्यापक वर्ग व विद्यार्थी यांच्याशी चर्चा करून स्थानिक चौकशी करील.

(३) स्थानिक चौकशी, निकषांनुसार मुद्यांवर आणि प्रमाणकांनुसार सुविधा अस्तित्वात आहेत आणि परिसंस्थांनी, जेथे विनिर्दिष्ट केले असेल तेथे, आवश्यक असलेल्या किमान अधिस्वीकृती आणि पुरेशी वित्तीय क्षमता, इत्यादी प्राप्त केलेली आहे किंवा कसे हे निर्धारित करण्यासाठी आणि समितीला आवश्यक वाटेल अशा अधिक माहितीसाठी करण्यात येईल.

(४) मंडळाचा सचिव, अर्ज व अर्जाची छाननी आणि स्थानिक चौकशी केल्यानंतर विद्या समितीचा अहवाल, मंडळासमोर त्यांच्या बैठकीमध्ये सादर करील, अहवाल स्वीकारण्यात यावा किंवा फेटाळण्यात यावा यासंबंधी या बैठकीमध्ये ठराव संमत करण्यात येईल. जर मंडळाने, बहुमताने किंवा एकमताने अर्ज व अहवाल फेटाळला आणि स्वायत्त दर्जा प्रदान करण्याची शिफारस न करण्याचा निर्णय घेतला, तर, मंडळ, त्याची कारणे नोंदवील. जर मंडळाने, अर्ज मंजूर करण्याचे आणि स्वायत्त दर्जा प्रदान करण्याची शिफारस करण्याचे प्रस्तावित केले तर, मंडळ, तशा अर्थाचा ठराव संमत करील आणि ज्या शर्तीच्या अधीन राहून स्वायत्त दर्जा प्रदान करण्यात येईल त्या शर्ती विनिर्दिष्ट करील.

(५) मंडळाचा सचिव, ठरावाची प्रत आणि मंडळ ठरवील असे इतर अभिलेख यांसह मंडळाच्या अशा शिफारशी मान्यतेसाठी, शासनाच्या सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्याकडे एका महिन्याच्या आत सादर करील.

(६) अर्जदार, कला परिसंस्थेला स्वायत्तता प्रदान करण्याबाबत शासनाकडून मान्यता मिळाल्यावर, मंडळाचा सचिव, ही बाब, त्याच्या कोणत्याही असल्यास, शर्तीसह संबंधित कला परिसंस्थेला लेखी कळवील.

(७) स्वायत्तता प्रदान करण्यास नाकारल्याबाबत देखील संबंधित परिसंस्थेला कळविण्यात येईल.

(८) स्वायत्तता प्रदान करण्याचे अर्ज मंडळाच्या सचिवास प्राप्त झाल्याच्या शेवटच्या दिनांकापासून दहा महिन्यांच्या आत, पोट-कलमे (१) ते (७) मध्ये निर्दिष्ट केलेली कार्यवाही पूर्ण करण्यात येईल.

(९) संबंधित नियामक प्राधिकरणाने वेळोवेळी तरतूद केलेली कोणतीही मार्गदर्शक तत्त्वे, नियम, विनियम, इत्यादी, स्वायत्तता मागणा-या कला परिसंस्थेला आणि अगोदरच स्वायत्ततेचा दर्जा प्रदान केलेल्या कला परिसंस्थेला लागू होतील.

स्वायत्त दर्जा काढून घेणे.

**३४.** (१) मंडळ, तक्रार प्राप्त झाल्यानंतर किंवा स्वाधिकारे, चौकशी केल्यानंतर, स्वायत्त दर्जा प्रदान केलेल्या परिसंस्थांनी, कलम २५ च्या तरतुदींचे अनुपालन करण्यात कसूर केली असल्याची खात्री पटल्यास, ते, अशा परिसंस्थेचा स्वायत्त दर्जा काढून घेण्याची शासनास शिफारस करील आणि यावरील शासनाचा निर्णय, अंतिम व बंधनकारक असेल :

परंतु, मंडळ, अशा परिसंस्थेला बाजू मांडण्याची संधी दिल्याशिवाय, परिसंस्थेचा स्वायत्त दर्जा काढून घेण्याची शिफारस शासनास करणार नाही.

(२) परिसंस्थेचा स्वायत्त दर्जा काढून घेण्याबाबत मंडळाकडून, शिफारस प्राप्त झाल्यावर, शासन, अशा परिसंस्थेचा स्वायत्त दर्जा काढून घेईल. यासंबंधातील, शासनाचा निर्णय, अंतिम व बंधनकारक असेल.

समतुल्यता व पात्रता.

**३५.** (१) जिला स्वायत्तता दिलेली आहे त्या परिसंस्थेने, तिच्या पाठ्यक्रमांसाठी व अध्ययनक्रमांसाठी मंडळाकडून समतुल्यता मिळविणे आवश्यक असेल.

(२) स्वायत्त संस्था, त्यांचे अभ्यासक्रम, अध्यापन व परीक्षा योजना, वेळोवेळी मंडळाकडून मान्य करून घेतील.

(३) मंडळ, अशा स्वायत्त संस्थांची, तीन वर्षांतून किमान एकदा तपासणी करील.

(४) मंडळ, स्वायत्त परिसंस्थांच्या अभ्यासक्रम, अध्यापन, परीक्षा योजना, शिकवण्याचे तास, शैक्षणिक वेळापत्रक, परीक्षेला बसण्यासाठी उमेदवारांची पात्रता, इत्यादीसारख्या सर्व शैक्षणिक व परीक्षेशी संबंधित कार्यांचे संनियंत्रण करील.

(५) स्वायत्त दर्जा दिलेल्या परिसंस्था, मूल्यनिर्धारण करतील, निकाल घोषित करतील आणि वेगवेगळ्या अध्ययनक्रमांसाठी संयुक्त-प्रमाणपत्र किंवा पदविका देण्याकरिता मंडळाला शिफारस करतील.

(६) स्वायत्त कला परिसंस्थांच्या नियामक मंडळावर आणि इतर समित्यांवर मंडळाचे प्रतिनिधी असतील.

(७) मंडळ, रोजगाराच्या, शिक्षणाच्या प्रयोजनासाठी कोणत्याही पदविकेला, पदव्युकेत्तर पदविकेला, पदव्युत्तर पदविकेला, प्रगत पदविकेला महाराष्ट्रात, महाराष्ट्राबाहेर किंवा भारताबाहेर स्थित असलेले कोणतेही तत्सम मंडळ, विद्यापीठ, कोणतेही परीक्षा प्राधिकरण यांच्या नियंत्रणाखाली कोणत्याही शासकीय मान्यताप्राप्त संस्थेने चालवलेल्या अशा कोणत्याही अध्ययनक्रमाला, अभ्यासक्रमाची छाननी करून त्या आधारे समतुल्यता प्रदान करील.

(८) मंडळ, त्याची कोणतीही पदविका, पदव्युकेत्तर पदविका, पदव्युत्तर पदविका, प्रगत पदविका किंवा मंडळ चालवत असलेला असा कोणताही अध्यनक्रम यासाठी आवश्यक असेल त्या त्या वेळी भारतातील किंवा भारताबाहेरील कोणत्याही तत्सम मंडळाकडून, महाविद्यालयाकडून, विद्यापीठाकडून किंवा इतर कोणत्याही परीक्षा प्राधिकरणाकडून समतुल्यता मिळवील.

(९) मंडळ, कोणत्याही पाठ्यक्रमास किंवा अध्ययनक्रमास देण्यात आलेल्या समतुल्यतेच्या आधारे पात्रता प्रमाणपत्रे देईल.

**परिसंस्था बंद करणे.**

**३६.** (१) परिसंस्थेच्या व्यवस्थापनाला, शासनाच्या आणि परिसंस्था सुरू करण्यासाठी मान्यता देणा-या इतर नियामक प्राधिकरणाच्या पूर्वपरवानगीशिवाय, परिसंस्था बंद करण्याची अनुमती देण्यात येणार नाही.

(२) परिसंस्था बंद करू इच्छिणारे व्यवस्थापन, परिसंस्था बंद करण्याची संपूर्ण कारणे नमूद करून आणि इमारती व साधनसामग्री यांच्या रुपात असलेल्या मत्ता, त्यांची मूळ किंमत, प्रचलित बाजार मूल्य आणि त्यास शासनाकडून किंवा सार्वजनिक वित्त पुरवठा अभिकरणांकडून त्या वेळेपर्यंत मिळालेली अनुदाने यांचा निर्देश करून, मंडळाने, किंवा यथास्थिति, यथोचित नियामक प्राधिकरणाने घोषित केलेल्या वेळापत्रकानुसार, मंडळाकडे अर्ज करील :

परंतु, विनाअनुदानित परिसंस्थेचे व्यवस्थापन, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना प्रदेय असलेल्या वित्तलब्धींसह, परिसंस्था किंवा पाठ्यक्रम बंद करण्यातून उद्‌भवणारे दायित्व केवळ अशा परिसंस्थेच्या व्यवस्थापनाचे असेल, अशी हमी देखील शपथपत्रावर देईल.

(३) असा अर्ज मिळाल्यावर, परिसंस्था बंद करण्यास परवानगी देण्यात यावी किंवा कसे याचे मूल्यनिर्धारण करण्यासाठी व ते ठरविण्यासाठी मंडळ त्याला योग्य वाटेल अशी चौकशी करण्याची व्यवस्था करील :

परंतु, व्यवस्थापनाला बाजू मांडण्याची संधी दिल्याशिवाय, परिसंस्था बंद करण्याचा अर्ज मंडळाकडून नाकारण्यात येणार नाही.

(४) जर मंडळाने परिसंस्था बंद करण्याची शिफारस करण्याचे ठरविले तर, ते, शासनाकडून किंवा इतर सार्वजनिक वित्त पुरवठा अभिकरणांकडून पुरविण्यात आलेल्या निधींचा वापर करून निर्माण केलेल्या मत्ता शासनाकडे किंवा इतर व्यवस्थापनाकडे हस्तांतरित करण्यात याव्यात किंवा कसे आणि नोकर कपात केलेले अध्यापक व कर्मचारीवर्ग यांना प्रदान करावयाची भरपाई याबाबतीत अहवाल तयार करील व तो शासनाला किंवा, यथास्थिति, नियामक प्राधिकरणाला सादर करील.

(५) जर मंडळाने, संलग्न परिसंस्था बंद करण्याची शिफारस केली असेल आणि परिसंस्था सुरू करण्यासाठी ज्या नियामक प्राधिकरणाने परवानगी दिली आहे त्या नियामक प्राधिकरणाकडून परिसंस्था बंद करण्यासाठी पूर्व परवानगी मिळाली असेल तर, शासनास, ती बंद करण्याचे आदेश देता येतील.

(६) परिसंस्था टप्प्याटप्प्याने बंद करण्याची प्रक्रिया ही, मंडळाने विहित केल्याप्रमाणे असेल.

(७) परिसंस्थेत आधीच प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये या दृष्टीने, परिसंस्था बंद करण्याची प्रक्रिया टप्प्याटप्प्याने करण्यात येईल, आणि पहिल्या वर्षाचे वर्ग प्रथम बंद करण्यात येतील आणि कोणालाही नव्याने प्रवेश दिला जाणार नाही.

(८) या कलमामध्ये दिलेली कार्यपद्धती, मंडळास संलग्न असलेला पाठ्यक्रम किंवा अध्ययनक्रम बंद करण्यासाठी, योग्य त्या फेरफारांसह लागू असेल.

**परिसंस्थेच्या व्यवस्थापनातील बदल किंवा हस्तांतरण.**

**३७.** (१) परिसंस्थांच्या व्यवस्थापनाच्या बदलाकरिता किंवा हस्तांतरणाकरिता शासनाची परवानगी मागणारे व्यवस्थापन, मंडळाने, किंवा यथास्थिति, नियामक प्राधिकरणाने घोषित केलेल्या वेळापत्रकानुसार, मंडळाकडून किंवा यथास्थिति, नियामक प्राधिकरणाकडून विहित करण्यात येईल अशा नमुन्यात मंडळाच्या सचिवाकडे, अर्ज करील.

(२) वेळापत्रकामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालमर्यादेत प्राप्त झालेल्या अशा सर्व अर्जांची, मंडळाकडून छाननी करण्यात येईल आणि ते, उक्त वेळापत्रकामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालमर्यादेत, शासनाकडे व नियामक प्राधिकरणाकडे पाठविण्यात येतील.

(३) शासनास, परवानगी मागणा-या व्यवस्थापनाची योग्यता विचारात घेऊन, त्याच्या संपूर्ण स्वेच्छाधिकारामध्ये त्यास योग्य व उचित वाटतील अशा परिसंस्थांना परवानगी देता येईल.

## प्रकरण पाच

## निधी, वित्तव्यवस्था, लेखे व लेखापरीक्षा.

मंडळाच्या मत्तांचा वापर.

**३८.** मंडळाकडे निहित असलेली सर्व मालमत्ता, निधी व इतर मत्ता, या अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीनतेने व प्रयोजनार्थ मंडळ धारण करील व वापरील.

मंडळाचा निधी, त्याची अभिरक्षा व गुंतवणूक.

**३९.** (१) मंडळाचा स्वतःचा एक निधी असेल, आणि त्यात पुढील रकमा जमा करण्यात येतील :—

(क) मंडळाने बसविलेल्या व गोळा केलेल्या शास्तीसह शुल्क, स्वामित्वधन व आकार ;

(ख) शासनाने, त्याला दिलेली कोणतीही असल्यास, अनुदाने, अभिहस्तांकित रकमा, अंशदाने व कर्जे ;

(ग) कोणतीही असल्यास, मृत्यूपत्रित दाने, देणग्या व दाननिधी किंवा इतर अंशदाने ;

(घ) त्याच्याकडे निहित असलेल्या कोणत्याही कर्जरोख्यांवरील व्याज आणि त्याच्या विक्रीचे उत्पन्न ;

(ङ) त्याच्याकडे निहित असलेल्या मालमत्तेपासून मिळणारे सर्व भाडे व नफा ;

(च) मंडळास किंवा त्याच्या वतीने मिळालेला इतर पैसा.

(२) मंडळाला, त्याच्या निधीपैकी विहित करण्यात येईल अशी रक्कम, भारतीय स्टेट बँकेतील किंवा बँक व्यवसाय विनियमन अधिनियम, १९४९ याच्या कलम २२ अन्वये भारतीय रिझर्व्ह बँकेने दिलेले लायसन धारण करणा-या भारतीय रिझर्व्ह बँक अधिनियम, १९३४ यामध्ये व्याख्या दिलेल्या कोणत्याही अनुसूचित बँकेतील किंवा शासनाने मान्यता दिलेल्या अन्य कोणत्याही बँकेतील चालू किंवा ठेव खात्यात ठेवता येईल आणि उक्त रकमेपेक्षा अधिक असलेला कोणताही पैसा, शासन मान्यता देईल अशा रीतीने गुंतवण्यात येईल.

१९४९ चा १०.
१९३४ चा २.

(३) याबाबतीत केलेल्या विनियमांद्वारे मंडळ प्राधिकृत करील अशा मंडळाच्या अधिका-यांकडून अशी खाती चालविण्यात येतील.

(४) मंडळाला, विद्यार्थी विकास कार्यक्रम, विद्यार्थी शिष्यवृत्ती, प्रकल्प स्पर्धा, नवोपक्रम व नवसंशोधन उपक्रम, नागरी बांधकामे, कर्मचारी वेतन संरक्षण निधी आणि कौशल्य केंद्र व उत्कृष्टता केंद्र यांची स्थापना व विकास किंवा अन्य कोणतीही उद्दिष्टे यांचा समावेश असणा-या, परंतु तेवढ्या पुरते मर्यादित नसलेल्या उद्दिष्टांसाठी किंवा अन्य कोणत्याही उद्दिष्टांसाठी चालू वर्षापासून मूळनिधीमध्ये हस्तांतरित केल्यानंतर जमा झालेल्या अतिरिक्त रकमेतून राखून ठेवलेला विशिष्ट उद्दिष्ट निधी नियमितपणे चालू ठेवण्याचा आणि निर्माण करण्याचा अधिकार असेल. त्याची निर्मिती व वापर, मंडळाच्या निदेशानुसार करण्यात येईल.

निधीचा सर्वसाधारण वापर.

**४०.** (१) या अधिनियमाच्या तरतुदींस अधीन राहून, मंडळाच्या निधीचा वापर, या अधिनियमात विनिर्दिष्ट केलेल्या बाबींशी संबंधित असलेले आकार व खर्च प्रदान करण्यासाठी आणि ज्या प्रयोजनासाठी या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये मंडळास अधिकार प्रदान केलेले आहेत व मंडळावर कर्तव्ये लादलेली आहेत अशा इतर कोणत्याही प्रयोजनांसाठीच केवळ करण्यात येईल.

(२) निधीच्या जमा रकमा व संचयन विचारात घेतल्यानंतर, निधीतील संचयित शिल्लकीचा भाग, नियामक परिषदेच्या पूर्व मंजुरीने, पुढीलपैकी सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी, मंडळास, वेळोवेळी, वापरता येईल :–

(एक) मंडळाच्या मालमत्तांचा विकास आणि मंडळाच्या प्रयोजनांसाठी जंगम व स्थावर मत्तांचे संपादन ;

(दोन) मंडळाच्या इमारतींचे बांधकाम ;

(तीन) शासकीय कला परिसंस्थांचे आदर्श परिसंस्था म्हणून किंवा उत्कृष्टता केंद्र म्हणून व्यवस्थापन करण्यासाठी किंवा संस्थांमधील विशिष्ट कार्यशाळांची दर्जावाढ करण्यासाठी :

परंतु, उपरोक्त प्रयोजनासाठी कोणत्याही आर्थिक वर्षामध्ये वापरलेला निधी, मागील आर्थिक वर्षाच्या अखेरीस पायाभूत सुविधांच्या विकासासाठी राखून ठेवलेल्या निधीमधील शिल्लक रकमेच्या पंचवीस टक्क्यांपेक्षा अधिक असणार नाही :

परंतु, आणखी असे की, अशा पंचवीस टक्क्यांपैकी पन्नास टक्क्यांपेक्षा अधिक रक्कम, त्या आर्थिक वर्षामध्ये एकाच प्रकल्पावर वापरली जाणार नाही.

निधीतून रकमा काढणे.

**४१.** याबाबतीत मंडळाने प्राधिकृत केलेल्या अधिका-याने सही केलेल्या धनादेशाद्वारे किंवा पतपत्राद्वारे असेल त्याखेरीज, बँकेद्वारे किंवा याबाबतीत नोंदणीकृत इमेल आयडीवरून बँकेस इमेल पाठवून ईलेक्ट्रॉनिक पद्धतीने मंडळाच्या निधीमधून कोणतेही प्रदान करण्यात येणार नाही.

प्रादेशिक कार्यालयांना नियतवाटप.

**४२.** मंडळ, अधिनियमाशी विसंगत नसतील अशी प्रत्येक प्रादेशिक कार्यालयांच्या अधिकारितेतील कामे किंवा विकास योजना पूर्ण करण्यासाठी मंडळाने प्रादेशिक कार्यालयांवर लादलेली कर्तव्ये व कार्ये पार पाडणे त्यांना शक्य व्हावे म्हणून मंडळ निर्धारित करील अशा रकमा, ते वेळोवेळी प्रादेशिक कार्यालयांना प्रदान करील.

वार्षिक अर्थसंकल्प तयार करणे.

**४३.** (१) मंडळ, विहित करण्यात येईल अशा तारखेपूर्वी व अशा रीतीने, पुढील वित्तीय वर्षाचे उत्पन्न व खर्च यांची अर्थसंकल्पीय अंदाजपत्रके तयार करील.

(२) मंडळ, पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या तारखेस किंवा त्यानंतर, त्याने तयार केलेल्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकांवर विचार करील आणि त्याने मान्य केल्याप्रमाणे ती, मान्यतेसाठी नियामक परिषदेस सादर करील आणि त्यानंतर मंजुरीसाठी ती शासनास सादर करील. शासनास, अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकांच्या संदर्भात त्यास योग्य वाटतील असे, आदेश देता येतील व ते मंडळाला कळविता येतील. मंडळ, असे आदेश अंमलात आणील.

वार्षिक लेखे व लेखापरीक्षण.

**४४.** (१) मंडळ, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व रीतीने लेखे ठेवील.

(२) मंडळाच्या लेख्यांची, नियामक परिषदेच्या पूर्वमान्यतेने मंडळाने नियुक्त केलेल्या लेखापरीक्षकाकडून लेखापरीक्षा करण्यात येईल.

(३) शासनास, जर त्यास, आवश्यक वाटले तर, मंडळाच्या लेख्यांची लेखापरीक्षा करण्यासाठी विशेष लेखापरीक्षकाची नियुक्ती करता येईल.

(४) लेखापरीक्षक किंवा, यथास्थिति, विशेष लेखापरीक्षक, त्याचा अहवाल, मंडळास सादर करील व त्याची एक प्रत नियामक परिषदेस पाठवील.

(५) पोट-कलम (२) किंवा (३) खालील लेखापरीक्षेचा खर्च, मंडळाकडून करण्यात येईल.

निरीक्षण व चौकशी.

**४५.** (१) शासनास, मंडळाची, मंडळाशी संलग्न व अधिकृत असलेल्या कोणत्याही पदविका स्तरावरील कला परिसंस्थांच्या इमारतींची, वसतिगृहांची, कार्यशाळांची, ग्रंथालयांची व साधनसामग्रीची, अशा कोणत्याही कला परिसंस्थेत केल्या जाणा-या अध्यापनाची किंवा इतर कामाची आणि मंडळाच्या वतीने घेतल्या जाणा-या कोणत्याही परीक्षेच्या संचालनाची, शासन निदेश देईल अशा व्यक्तीकडून किंवा व्यक्तींकडून तपासणी करविण्याचा आणि मंडळाशी संबंधित असलेल्या कोणत्याही बाबीच्या संबंधात तशाच रीतीने चौकशी करविण्याचा हक्क असेल. शासन, प्रत्येक प्रकरणी, अशी तपासणी किंवा चौकशी करविण्याच्या आपल्या उद्देशाची मंडळाला यथोचित सूचना देईल आणि मंडळ, एक प्रतिनिधी नेमण्यास हक्कदार असेल, अशा प्रतिनिधीस, अशा तपासणीच्या किंवा चौकशीच्या वेळी हजर राहण्याचा व बाजू मांडण्याचा हक्क असेल.

(२) शासन, अशा तपासणीच्या किंवा चौकशीच्या निष्कर्षांच्या संदर्भातील आपले विचार, मंडळाला कळवील आणि त्यावरील मंडळाचे मत आजमाविल्यानंतर, करावयाच्या कारवाईबद्दल त्याला सल्ला देऊ शकेल आणि अशी कारवाई करण्यासाठी कालमर्यादा निश्चित करू शकेल.

(३) तपासणीच्या किंवा चौकशीच्या निष्कर्षाबाबत मंडळाने केलेल्या किंवा करण्याचे योजिलेल्या अशा कारवाईचा अहवाल, कोणताही असल्यास, मंडळ, शासनास कळवील. असा अहवाल, मंडळाच्या त्यावरील मतांसह, शासन निदेश देईल अशा वेळेच्या आत, सादर करण्यात येईल.

(४) जेव्हा मंडळाने शासनाचे समाधान होईल अशी कारवाई निश्चित केलेल्या वेळेच्या आत केली नसेल त्याबाबतीत, शासन, मंडळाने सादर केलेले कोणतेही स्पष्टीकरण किंवा केलेले अभिवेदन विचारात घेतल्यानंतर, त्यास योग्य वाटेल असे निदेश देऊ शकेल आणि मंडळ, अशा निदेशांचे अनुपालन करील.

मंडळाने सादर करावयाची माहिती, विवरणे, इत्यादी.

**४६.** (१) मंडळ, शासन फर्मावील असे अहवाल, विवरणे व विवरणपत्रे आणि शासन मागवील अशी त्याच्याशी निगडीत असलेल्या कोणत्याही बाबीशी संबंधित असणारी अशी आणखी माहिती, शासनास पुरवील.

(२) शासन, सादर केलेले असे कोणतेही अहवाल, विवरणे किंवा विवरणपत्रे किंवा माहिती विचारात घेतल्यानंतर, त्यास आवश्यक वाटतील असे, या अधिनियमाशी सुसंगत असणारे, निदेश देऊ शकेल, आणि मंडळ, अशा निदेशांचे अनुपालन करील.

शुल्क निश्चिती समिती.

**४७.** (१) राज्य शासन, मान्यता दिलेल्या व मंडळाशी संलग्न असलेल्या विनाअनुदानित खाजगी कला संस्थांद्वारे चालविण्यात येणा-या प्रत्येक पदविका स्तरीय कला शिक्षण देण्याचा वास्तव खर्च ठरविण्यासाठी, आदेशाद्वारे एक शुल्क निश्चिती समिती घटित करील. शासन, शुल्क निश्चिती समितीचा अध्यक्ष व सदस्य यांना प्रदेय असलेली वित्तलब्धी व इतर भत्ते, त्यांचा पदावधी व त्यांच्या सेवेच्या शर्ती, अशा आदेशामध्ये विनिर्दिष्ट करील.

२०१५ चा महा. २८.

(२) महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ याची कलमे १४ व १५ यांमध्ये तरतूद केलेल्या शुल्क नियामक प्राधिकरणाची कार्ये, अधिकार व त्याने अनुसरावयाची कार्यपद्धती आणि असे प्रत्येक शिक्षण देण्याचा वास्तव खर्च ठरविताना, शुल्क संरचनेचे निर्धारण करण्याचे घटक, पोट-कलम (१) अन्वये घटित केलेल्या शुल्क निश्चिती समितीद्वारे योग्य त्या फेरफारांसह, अनुसरण्यात येतील.

## प्रकरण सहा

## पूरक व संकीर्ण तरतुदी

निदेश देण्याचा शासनाचा अधिकार.

**४८.** (१) शासनाला, मंडळाने दिलेला सल्ला (कोणताही असल्यास) किंवा अन्यथा विचारात घेतल्यानंतर, कलम ८ च्या खंड (क) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही बाबीच्या संबंधात त्यास आवश्यक वाटतील असे निदेश, देण्याचा अधिकार असेल. मंडळ, अशा निदेशांचे अनुपालन करील.

(२) शासनास, मंडळाने चालविलेल्या किंवा केलेल्या किंवा मंडळ चालवित असलेल्या किंवा करीत असलेल्या किंवा चालविण्याचा किंवा करण्याचा इरादा असलेल्या कोणत्याही गोष्टीच्या संदर्भात मंडळाला सूचना देण्याचा आणि त्या बाबतीतील आपली मते मंडळाला कळविण्याचा हक्क देखील असेल.

(३) मंडळ, कळविलेल्या बाबीसंबंधात त्याने कोणतीही कारवाई करण्याचे योजिलेले असल्यास किंवा अशी कारवाई केलेली असल्यास, तसे शासनाला कळवील, आणि जर त्याने अशी कारवाई करण्यात कसूर केला असेल तर, त्याबाबत स्पष्टीकरण देईल.

(४) जर मंडळाने शासनाचे समाधान होईल अशा वाजवी वेळेत कारवाई केली नाही तर, शासन, मंडळाने दिलेले कोणतेही स्पष्टीकरण किंवा केलेले अभिवेदन विचारात घेतल्यानंतर, त्यास आवश्यक वाटतील असे या अधिनियमाशी सुसंगत असणारे निदेश देऊ शकेल, आणि मंडळ, अशा निदेशांचे अनुपालन करील.

(५) शासनाच्या मते, ज्यावेळी, तात्काळ कारवाई करणे आवश्यक आहे अशा निकडीच्या प्रसंगी, शासनास, संबंधित मंडळाशी अगोदर विचारविनिमय न करता, त्यास आवश्यक वाटेल अशी, या अधिनियमाशी सुसंगत असणारी कारवाई करता येईल, आणि शासन, केलेल्या कारवाईबाबत मंडळास ताबडतोब कळवील.

(६) मंडळाचा कोणताही ठराव, आदेश किंवा कृती ही, या अधिनियमाद्वारे किंवा त्यान्वये मंडळास प्रदान केलेल्या अधिकारांचा अतिरिक्त वापर करून करण्यात आली आहे असे शासनाचे मत झाले तर, शासनास, लेखी आदेशाद्वारे, कारणे विनिर्दिष्ट करून, मंडळाचा कोणताही ठराव किंवा आदेश याची अंमलबजावणी स्थगित करता येईल आणि मंडळाने जी कारवाई करण्याचा आदेश दिला असेल किंवा तसा आदेश देण्याचे अभिप्रेत असेल ती कारवाई करण्यास प्रतिबंध करता येईल.

समितीस प्रत्यायोजित केलेल्या अधिकारांचा वापर करण्याची रीत.

**४९.** मंडळाकडून, विनियमांद्वारे समितीकडे ज्या प्रत्यायोजित करण्यात आलेल्या आहेत अशा, अधिनियमाद्वारे मंडळास प्रदान केलेल्या अधिकारांचा मंडळाने वापर करण्याशी संबंधित असणा-या सर्व बाबी, त्या समितीकडे निर्दिष्ट केल्या जातील आणि अशा कोणत्याही अधिकारांचा वापर करण्यापूर्वी, मंडळ, विवादित बाबीसंबंधातील त्या समितीचा अहवाल प्राप्त करील व त्यावर विचार करील.

विनियम करण्याचे मंडळाचे अधिकार.

**५०.** (१) मंडळास, या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्याच्या प्रयोजनार्थ, नियामक परिषदेच्या व शासनाच्या मान्यतेने, विनियम करता येतील.

(२) विशेषकरून व पूर्वगामी अधिकाराच्या सर्वसाधारणतेस बाध येऊ न देता, अशा विनियमांमध्ये पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही बाबींसाठी तरतूद करता येईल :—

(क) कलम २० अन्वये नियुक्त केलेल्या समित्यांची रचना, अधिकार व कर्तव्ये ;

(ख) परीक्षांचे विषय व अभ्यासक्रम ;

(ग) परीक्षेसाठी, नियमित व बहिःस्थ उमेदवारांच्या प्रवेशाचे विनियमन करणा-या सर्वसाधारण शर्ती आणि ज्यांची पूर्तता केल्यावर अशा कोणत्याही परीक्षेसाठी प्रवेश मिळण्याचा आणि बसण्याचा उमेदवारांना हक्क असेल अशा पात्रता, उपस्थिती, सत्रातील काम आणि वर्तणूक यासंबंधीच्या विशिष्ट शर्ती ;

(घ) कोणत्याही विषयात व संपूर्ण परीक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी तसेच कोणत्याही विषयात सूट, विशेष योग्यता व विशेष प्राविण्य मिळविण्यासाठी आवश्यक असलेले गुण ;

(ङ) परीक्षांचे प्रवेश शुल्क आणि या परीक्षांच्या संबंधातील इतर बाबींच्याबाबत प्रदेय असलेले इतर शुल्क व आकार ;

(च) परीक्षा घेण्याची व निकाल प्रसिद्ध करण्याची व्यवस्था ;

(छ) परीक्षकांची नेमणूक, परीक्षेच्या संबंधातील त्यांचे अधिकार व कर्तव्ये आणि त्यांचे पारिश्रमिक व ते प्रदान करण्याची पद्धत ;

(ज) परीक्षकांची पात्रता व अपात्रता ;

(झ) प्रमाणपत्रे देणे ;

(ञ) मंडळाच्या वित्तव्यवस्थेचे सर्व बाबतीत नियंत्रण, प्रशासन, सुरक्षित अभिरक्षा व व्यवस्थापन ;

(ट) मंडळ ज्या दिनांकापूर्वी व ज्या रीतीने त्याची अर्थसंकल्पीय अंदाजपत्रके तयार करील, तो दिनांक व रीत ;

(ठ) मंडळाच्या व त्याने नियुक्त केलेल्या समितीच्या सदस्यांना आहरित करता येईल असा पूरक भत्ता ;

(ड) परीक्षा सुरळीतपणे पार पाडण्यासाठी शासकीय, अनुदानित व विनाअनुदानित कला परिसंस्था यांच्याकडील अधिका-यांची व कर्मचारीवर्गाची नेमणूक करणे ;

(ढ) या अधिनियमान्वये विहित करावयाची किंवा विहित करता येईल अशी इतर कोणतीही बाब.

पहिले विनियम.

**५१.** (१) कलम ५० मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, पहिले विनियम शासनाद्वारे करण्यात येतील आणि ते मंडळाकडून यथोचितरीत्या करण्यात येईपर्यंत अंमलात असण्याचे चालू राहतील.

(२) जर कलम ५० मध्ये निर्दिष्ट केलेल्या बाबींपैकी कोणत्याही बाबींच्या संबंधात कोणतेही नवीन विनियम करणे, त्यात फेरबदल करणे किंवा ते पूर्णतः किंवा अंशतः निरसित करणे इष्ट आहे असे कोणत्याही वेळी शासनास वाटले तर, शासनास, मंडळाशी विचारविनिमय केल्यानंतर व शासकीय **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, असे विनियम करता येतील किंवा त्यात फेरबदल करता येतील किंवा असे विनियम, एकतर पूर्णतः किंवा अंशतः निरसित करता येतील. अशाप्रकारे फेरबदल केलेले किंवा निरसित केलेले विनियम, शासन अशा अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करील अशा दिनांकापासून किंवा असा कोणताही दिनांक विनिर्दिष्ट केला नसेल तर, **शासकीय राजपत्रामध्ये** उक्त अधिसूचना प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून, अशा दिनांकापूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टींच्या बाबतीत असेल ते खेरीजकरून, अंमलात येतील.

उप-विधी करण्याचा मंडळाचा अधिकार.

**५२.** मंडळास, पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही बाबींकरिता तरतूद करण्यासाठी या अधिनियमाशी सुसंगत असतील असे उप-विधी करता येतील.

(क) मंडळाच्या आणि त्याने नेमलेल्या समित्यांच्या सभांमध्ये अनुसरावयाची कार्यपद्धती व अशा बैठकीमध्ये गणपूर्ती होण्यासाठी आवश्यक असलेल्या सदस्यांची संख्या ;

(ख) या अधिनियमाद्वारे किंवा त्यान्वये केलेल्या विनियमांद्वारे ज्याच्याबाबतीत तरतूद केलेली नाही, अशा केवळ मंडळाशी आणि त्यांच्या समित्यांशी संबंधित असलेली इतर कोणतीही बाब.

**शंका उपस्थित झाल्यास, अन्वयार्थ लावणे.**

**५३.** या अधिनियमाच्या किंवा त्यान्वये केलेल्या कोणत्याही विनियमांच्या किंवा उप-विधींच्या कोणत्याही तरतुदींचा अन्वयार्थ लावण्याच्या संबंधात कोणताही प्रश्न उपस्थित झाला तर, ती बाब, निर्णयासाठी शासनाकडे निर्देशित करता येईल, आणि जर मंडळाच्या सदस्यांपैकी निदान तीन सदस्यांनी तशी मागणी केल्यास, ती बाब, अशा प्रकारे निर्णयार्थ शासनाकडे निर्देशित करण्यात येईल. त्यावरील शासनाचा निर्णय अंतिम असेल.

**पदविका स्तरावरील कला परिसंस्थांची कर्तव्ये व त्यांच्याकडून सहाय्य.**

**५४.** सर्व संलग्न व स्वायत्त पदविका स्तरावरील कला परिसंस्था, या अधिनियमाखालील मंडळाच्या कर्तव्यांचे पालन करण्यासाठी आणि कार्ये पार पाडण्यासाठी मंडळास आवश्यक असेल अशी मदत व सहाय्य करतील.

**सद्‌भावपूर्वक केलेल्या कारवाईस संरक्षण.**

**५५.** या अधिनियमान्वये किंवा त्याखाली केलेल्या विनियमांन्वये किंवा उप-विधीन्वये सद्‌भावपूर्वक केलेल्या अथवा करण्याचे अभिप्रेत असलेल्या किंवा करण्याचे उद्देशित असलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल, शासन किंवा नियामक परिषद किंवा मंडळ किंवा सदस्य यांच्याविरूद्ध अथवा शासनाच्या किंवा नियामक परिषदेच्या किंवा मंडळाचा कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी यांच्याविरूद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल करण्यात येणार नाही.

**नियामक परिषदेचे व मंडळाचे सदस्य, अधिकारी व कर्मचारी लोकसेवक असणे.**

**५६.** नियामक परिषदेचे व मंडळाचे सर्व सदस्य, अधिकारी व कर्मचारी हे, जेव्हा या अधिनियमाच्या तरतुदीपैकी कोणत्याही तरतुदीनुसार कार्य करतील किंवा कार्य करण्याचे अभिप्रेत असेल तेव्हा, भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक असल्याचे मानण्यात येतील.

१८६० चा ४५.

**अनधिकृत परिसंस्था व पाठ्यक्रम.**

**५७.** (१) जर कोणत्याही पदविका स्तरावरील कला परिसंस्थेस मंडळाकडून संलग्नता किंवा मान्यता देण्यात आलेली नसेल तर आणि तसेच जर पदविका स्तरावरील कला शिक्षणाच्या कोणत्याही पाठ्यक्रमास मंडळाकडून मान्यता देण्यात आलेली नसेल तर, अशी पदविका स्तरावरील कला परिसंस्था किंवा पदविकास्तरावरील कला शिक्षणाचा कोणताही पाठ्यक्रम, महाराष्ट्र कृषी, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम (प्रतिबंध) अधिनियम, २०१३ या अन्वये अनधिकृत परिसंस्था व अनधिकृत पाठ्यक्रम असल्याचे मानण्यात येईल.

२०१३ चा महा. २०.

(२) उक्त अधिनियमाच्या तरतुदी, अशा अनधिकृत पदविका स्तरावरील कला परिसंस्थेस आणि अशा अनधिकृत पदविका स्तरावरील कला शिक्षणाच्या पाठ्यक्रमास लागू असतील.

**अडचणी दूर करण्याचा अधिकार.**

**५८.** (१) जर अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना, कोणतीही अडचण उद्‌भवली तर, राज्य शासनास, प्रसंगानुरुप उद्‌भवेल त्याप्रमाणे ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनांसाठी, त्यास आवश्यक किंवा इष्ट असल्याचे वाटतील असे, परंतु या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसतील असे निदेश, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे देता येतील :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढलेला प्रत्येक आदेश, तो काढल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर मांडण्यात येईल.

# अनुसूची

प्रदेश

(कलम २ (फ) पहा)

| | प्रदेश | जिल्हा |
|---|---|---|
| १. | छत्रपती संभाजीनगर | छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, बीड, धुळे, जळगाव, जालना, लातूर, नांदेड, हिंगोली, नाशिक, धाराशिव, नंदुरबार व परभणी. |
| २. | मुंबई | कोल्हापूर, मुंबई, मुंबई उपनगर, पुणे, रायगड, रत्नागिरी, सांगली, सातारा, सिंधुदुर्ग, सोलापूर, ठाणे व पालघर. |
| ३. | नागपूर | अकोला, अमरावती, भंडारा, बुलढाणा, चंद्रपूर, गडचिरोली, वाशीम, नागपूर, वर्धा, यवतमाळ व गोंदिया. |

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

शिक्षणातील विकास, रोजगारातील स्पर्धा, जगातील वेगाने बदलणारे तंत्रज्ञान, उद्योगाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आणि कलाकारांमधील उद्योजक संस्कृती विकसित करण्यासाठी पदविका स्तरीय कला शिक्षणाचे विनियमन करणे आवश्यक झाले आहे. गेल्या काही वर्षांमध्ये कला शिक्षणातील विविध पाठ्यक्रमांमध्ये वाढ झाली आहे. म्हणून, पदविका स्तरीय कला शिक्षणामधील गुणवत्ता, दर्जा व एकरूपता राखण्याची सुनिश्चित करणे आवश्यक झाले आहे.

**२.** महाराष्ट्र राज्यातील पदविका स्तरीय तांत्रिक शिक्षणाशी संबंधित असणा-या बाबींचे विनियमन करण्याकरिता महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ अधिनियम, १९९७ (१९९७ चा महा. ३८) अधिनियमित करण्यात आला आहे. याच धर्तीवर महाराष्ट्र राज्यातील पदविका स्तरीय कला शिक्षण, कला परिसंस्थांचे संलग्नीकरण व त्यामधील अभ्यास पाठ्यक्रम यांच्याशी संबंधित बाबींचे विनियमन करण्याकरिता आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी राज्य मंडळाची स्थापना व विधिसंस्थापन करण्यासाठी तरतूद करण्याकरिता एक कायदा अधिनियमित करण्याचे प्रस्तावित केले आहे.

**३.** या विधेयकाची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत :–

(क) पदविका स्तरीय शिक्षणाशी संबंधित असणा-या बाबींवर नियंत्रण ठेवण्यासाठी व संनियंत्रण करण्यासाठी एक शिखर संस्था असलेल्या नियामक परिषदेची स्थापना करणे;

(ख) पदविका स्तरीय कला शिक्षणाशी संबंधित असलेल्या बाबींचे विनियमन करण्याकरिता, कला परिसंस्थाच्या संलग्नीकरणास व त्यामधील पाठ्यक्रमांना मान्यता देण्यासाठी एक निगम निकाय असलेले, महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ स्थापन करणे;

(ग) प्रादेशिक कला शिक्षण मंडळांकरिता तरतूद करणे;

(घ) अध्यापन, संशोधन, विस्तार व सेवा यांद्वारे ज्ञान व समज यांचा प्रसार, निर्मिती व जतन करण्यासह मंडळाची सविस्तर उद्दिष्टे विनिर्दिष्ट करणे;

(ङ) पदविका स्तरीय कला शिक्षणाशी संबंधित असणा-या धोरणविषयक बाबींसंबंधी नियामक परिषदेस व शासनास सल्ला देणे, कला शिक्षणातील पदविकेचा एकरूप दर्जा राखणे, उद्योग व परिसंस्था यांमधील आदानप्रदानास प्रोत्साहन देणे, उमेदवारांना प्रमाणपत्र, शिष्यवृत्त्या, छात्रवृत्त्या प्रदान करणे, इत्यादींसारखे मंडळाचे अधिकार व कर्तव्ये विनिर्दिष्ट करणे;

(च) कला शिक्षण देणा-या परिसंस्थांना आणि कला शिक्षणातील पाठ्यक्रमांना संलग्नता देणे आणि संलग्न परिसंस्थांना स्वायत्त दर्जा प्रदान करणे, मंडळाच्या पाठ्यक्रमाची समतुल्यता व उमेदवारांची पात्रता ठरविणे;

(छ) मंडळाचा निधी घटित करण्यासाठी, त्याची अभिरक्षा व गुंतवणूक करण्यासाठी तरतूद करणे;

(ज) राज्य शासनाकडून शुल्क निश्चिती समिती घटित करण्यासाठी तरतूद करणे;

(झ) पदविका स्तरावरील कला परिसंस्थेस मंडळाकडून संलग्नता किंवा मान्यता देण्यात आली नसेल तर तसेच पदविका स्तरावरील कला शिक्षणाच्या कोणत्याही पाठ्यक्रमास मंडळाकडून मान्यता देण्यात आली नसेल तर, अशी परिसंस्था किंवा पाठ्यक्रम, महाराष्ट्र कृषी, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत परिसंस्था व अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम (प्रतिबंध) अधिनियम, २०१३ (२०१३ चा महा. २०) या अन्वये अनधिकृत परिसंस्था व अनधिकृत पाठ्यक्रम असल्याचे मानण्यात येईल अशी तरतूद करणे.

**४.** वरील उद्दीष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

नागपूर, **चंद्रकांत (दादा) पाटील,**

दिनांक १४ डिसेंबर, २०२३. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री.

## वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे ज्ञापन

या विधेयकात, वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे पुढील प्रस्ताव अंतर्भूत आहेतः-

**खंड १(२).–** या खंडान्वये, शासकीय **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ३.–** या खंडान्वये, शासकीय **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियामक परिषदेची स्थापना करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ५.–** या खंडान्वये, शासकीय **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे मंडळाची स्थापना करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ७(२).–** या खंडान्वये, परीक्षांचे आयोजन करण्याची आणि पदविका व इतर शैक्षणिक विशेषोपाध्या किंवा उपाध्या प्रदान करण्याची रीत, विनियमाद्वारे विहित करण्याचा अधिकार, मंडळाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ८.–** या खंडान्वये,–

(क) उप-खंड (ग) अन्वये, पदविका स्तरावरील कला परिसंस्थांसाठी आवश्यक असलेला कर्मचारी वर्ग, इमारती, फर्निचर, साधनसामग्री, लेखनसामग्री व इतर गोष्टी यांच्या संबंधात प्रमाणभूत शर्ती विहित करण्याचा व विनियमित करण्याचा अधिकार ;

(ख) उप-खंड (ङ) अन्वये, नियमित उमेदवारांना परीक्षेस प्रवेश देण्याचे नियमन करणा-या आणि तसेच पात्रता, उपस्थिती, सांघिक कार्य, इत्यादीशी संबंधीत असणा-या सर्वसाधारण शर्ती विहित करण्याचा अधिकार ;

(ग) उप-खंड (ञ) अन्वये, शुल्क व शास्ती निश्चित करणे व त्याची मागणी करणे व ती स्वीकारणे विहित करण्याचा अधिकार ;

(घ) उप-खंड (भ) अन्वये, उमेदवारांना परीक्षेस प्रवेश देणे, संलग्नता देणे, अधिस्वीकृती, स्वायत्तता प्रदान करणे व सममूल्यता देणे यासाठी शुल्क निश्चित करणे व त्याची मागणी करणे व ती स्वीकारणे हे विहित करण्याचा अधिकार,

मंडळाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ९(३).–** या खंडान्वये, मंडळाच्या सदस्यांना प्रदेय असलेले पूरक भत्ते विनियमांद्वारे विहित करण्याचा अधिकार, मंडळाकडे घेण्यात आला आहे.

**खंड २० (३).–** या खंडान्वये, विविध समित्यांच्या सदस्यांचा पदावधी, त्यानी पार पाडावयाची कर्तव्ये व कार्ये विनियमांद्वारे विहित करण्याचा अधिकार, मंडळाकडे घेण्यात आला आहे.

**खंड २३ (६).–** या खंडान्वये, मंडळाच्या संचालकांचे अधिकार व कर्तव्ये विनियमाद्वारे विहित करण्याचा अधिकार, मंडळाकडे घेण्यात आला आहे.

**खंड २४ (५) (ग).–** या खंडान्वये, मंडळाच्या सचिवाने वापरावयाचे अधिकार व पार पाडावयाची कर्तव्ये, विनियमांद्वारे विहित करण्याचा अधिकार, मंडळाकडे घेण्यात आला आहे.

**खंड २५.–** या खंडान्वये,–

(क) उप-खंड (१) अन्वये, संलग्नता मिळण्यासाठी अर्ज करण्याचा नमुना व रीत विहित करण्याचा अधिकार,

(ख) उप-खंड (२) (ग) अन्वये, अध्यापनासाठी व संशोधनासाठी आवश्यक असलेल्या भौतिक सुविधा व साधनसामग्री विहित करण्याचा अधिकार,

मंडळाकडे घेण्यात आला आहे.

**खंड २६(१).–** या खंडान्वये, नवीन परिसंस्था सुरू करण्यासाठी परवानगी मिळण्याच्या अर्जाचा नमुना, विहित करण्याचा अधिकार, मंडळाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ४३ (१).–** या खंडान्वये, मंडळाचे उत्पन्न व खर्च यांची अर्थसंकल्पीय अंदाजपत्रके तयार करण्याची रीत विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ४४(१).–** या खंडान्वये, मंडळाचे लेखे ठेवण्याचा नमुना व रीत विहित करण्याचा अधिकार, मंडळाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ५० (१).–** या खंडान्वये, या अधिनियमाची प्रयोजने अंमलात आणण्यासाठी विनियम करण्याचा अधिकार, मंडळाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ५१.–** या खंडान्वये, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे,–

(क) मंडळाद्वारे नवीन विनियम यथोचितरित्या करण्यात येईपर्यंत, जे नियमितपणे अंमलात असतील, असे, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी पहिले विनियम करण्याचा ;

(ख) नवीन विनियम करण्याचा अथवा अशा कोणत्याही विनियमांमध्ये एकतर संपूर्णतः किंवा अंशतः फेरबदल करण्याचा किंवा ते निरसित करण्याचा,

अधिकार, शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ५२.–** या खंडान्वये, समित्यांनी त्यांच्या बैठकीत अनुसरावयाची कार्यपद्धती व तिची गणपूर्ती यांच्याशी संबंधित असणा-या बाबी आणि हा अधिनियम व विनियम याद्वारे किंवा त्याअन्वये तरतूद न केलेल्या मंडळाशी संबंधित असणा-या अन्य कोणत्याही बाबी यांसाठी या अधिनियमांशी सुसंगत असणारे उपविधी करण्याचा अधिकार, मंडळाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ५८.–** या खंडान्वये, या अधिनियमांच्या तरतुदी अंमलात आणताना, जी उद्‌भवेल अशी कोणतीही अडचण दूर करण्यासाठी, शासकीय **राजपत्रात** आदेश काढण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**२.** वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे वर नमूद केलेले प्रस्ताव, सामान्य स्वरूपाचे आहेत.

## वित्तीय ज्ञापन

या विधेयकात, राज्यातील पदविका स्तरावरील कला शिक्षण देण्याशी, आणि कला परिसंस्था व त्यातील अभ्यासपाठ्यक्रम यांच्या संलग्नतेशी संबंधित असणा-या बाबींचे नियमन करण्यासाठी महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळाची स्थापना व विधिसंस्थापन करण्याची तरतूद केली आहे. या विधेयकाच्या खंड २४ मध्ये, शासनाद्वारे मंडळासाठी आवश्यक असेल अशा प्रशासकीय व तांत्रिक अधिका-यांची व कर्मचा-यांची नियुक्ती करण्याची तरतूद केली आहे.

हे विधेयक, राज्य विधिमंडळाचा अधिनियम म्हणून अधिनियमित झाल्यावर, मंडळासाठी नियुक्त करावयाचे प्रशासकीय व तांत्रिक अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन व इतर खर्च प्रदान करण्यासाठी राज्याच्या एकत्रित निधीतून प्रत्येक वर्षी करावयाच्या अंदाजे रुपये दोन करोड तेवीस लाख तेवीस हजार पाचशे चौसष्ठ इतक्या आवर्ती खर्चाचा, या विधेयकात अंतर्भाव असेल.

## भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २०७ अन्वये राज्यपालांची शिफारस

(महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, आदेशाची प्रत)

भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २०७ याच्या खंड (३) अन्वये महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून, ते महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ विधेयक, २०२३ विचारात घेण्याबाबत राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांना शिफारस करीत आहेत.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५९.]**

**[महाराष्ट्र राज्यातील पदविका स्तरावरील कला शिक्षणाशी संबंधित असणा-या कला परिसंस्था व त्यातील अभ्यास पाठ्यक्रम यांचे संलग्नीकरण करण्याशी संबंधित असणा-या बाबींचे विनियमन करण्याकरिता राज्य मंडळाची स्थापना व विधिसंस्थापन करण्यासाठी आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक.]**

**[श्री. चंद्रकांत (दादा) पाटील,**
उच्च व तंत्र शिक्षण मंत्री.**]**

**[विधानसभेने दिनांक १९ डिसेंबर, २०२३ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मुद्रणालय, नागपूर